७१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ३३३
१९३२
३३

ch1·92E

REFBK-0005909

REFBK-0005909

# वसंत-वैभव

REFBK-0005909

लेखक

**वसन्त चिन्धडे**, बी. ए. (ऑ.)

प्रस्तावनालेखक

**प्रा. श्रीपाद महादेव माटे**, एम्. ए.

१९३९

किंमत एक रुपाया

प्रकाशक —
यशवंत गोपाळ जोशी.
६२३/१५, सदाशिव, पुणें २.

[सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन आहेत.]

मुद्रक —
लक्ष्मण नारायण चाफेकर.
आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८(१७) सदाशिव, पुणें २.

ज्यांच्या शीतल छायेमुळें

दुःखाच्या झळी मला अजून लागल्या नाहींत

व

यापुढेंही लागणार नाहींत

त्या माझ्या

ती. बाबूकाकांस व सौ. ताईस

भक्तिपूर्वक अर्पण.

—वसन्त.



— वसन्त चिन्धडे

# ऋण-निर्देश

माझा हा पहिलाच भावगीतसंग्रह रसिकांच्या हातीं देतांना मला अत्यन्त आनंद होत आहे परंतु त्याबरोबरच माझ्या मनांत अेक प्रकारची दुःखाचीही भावना डोकावत आहे. आजपर्यंत जवळ जवळ ४–५ वर्षांपासून हृदयाशीं बाळगलेल्या ह्या कविता मी हात-वेगळ्या करीत आहें. रसिक त्यांचा कसा काय स्वीकार करतील ह्याही विचारानें मन कातर झाल्यावांचून रहात नाहीं.

प्रत्यक्ष निर्मिति होत असतां कवि आपल्या कवितेला कान्तेप्रमाणें आळवितो; ती प्रसन्न व्हावी म्हणून तिची आराधना करतो; तिचें येणें आपल्या घरीं वरचेवर व्हावें म्हणून तिची मनधरणी करतो; पण तीच कविता रसिकांचे हातीं देतांना तिला तो कन्येसमान मानतो. अर्थात् तिचा संसार सुखाचा व्हावा, तिला 'प्रेमळ पण शिरजोर' पति मिळावा, तिचें सर्वत्र कौतुक झालेलें बघावें अशीच त्याची इच्छा असते, आणि म्हणूनच तिला रसिकांचे हातीं देतांना 'कण्ठ स्तम्भित' होतो व 'हृदय संस्पृष्ट' होतें.

'वसंत-वैभव' या नांवांत कोणाला दर्पोक्ति दिसेल ती दिसो परंतु ती माझी श्रद्धा आहे. शारदेच्या मंदिरांत शिरल्यानंतर तिच्या आंगचें तेज बघून, तिचें अलंकार-वैभव पाहून, तिची मनाला भारण्याची कुसर पाहून जें वाक्वैभव माझ्या मनांत उचंबळून आलें त्याचा मनोज्ञ व स्पष्ट उच्चार करण्याचा मीं एक दुबळा प्रयत्न केला आहे. तिचें अल्प जरी गुणगान मी करूं शकलों तरी माझ्या वाणीचें सार्थक झालें अशी माझी भावना आहे.

'वसंत वैभवा'त कुणी दिपवून टाकील अशी झळाळी शोधूं गेल्यास त्याची निराशा होईल परंतु ह्या वैभवाकडे त्याला फिरून फिरून बघावेंसें वाटलें असें मला कुणीं सांगितल्यास मला आनंदच होणार आहे.

अर्थात् हें वैभव प्रकाशांत आणतांना मी कितीतरी मित्रांचा ऋणी झालों आहें. कितीतरी व्यक्तींनीं ह्या उत्सवास मला उत्साह दिला आहे. कितीतरी घटनांनीं हा दिवस उदयास आणला आहे. त्या मित्रांची, त्या व्यक्तींचीं, त्या घटनांची परिस्फुटता मी माझ्या मनाजवळच फक्त करूं शकतों. अमुक एक कविता जन्माला कां आली ह्याची फार चिकित्सा केल्यानें कवितेची खुमारी कळतेच असें नाहीं– किंबहुना असली चिकित्सा रसाला कधीं कधीं अपकर्षक होते.

एका गोष्टीचा स्पष्ट निर्देश मला केलाच पाहिजे. आणि ती म्हणजे प्राध्यापक माटे ह्यांनीं ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाला आणलेलें मूर्त स्वरूप. सहजीं म्हणून मी त्यांना कविता वाचून दाखवायला कांहीं रविवारीं त्यांचेकडे गेलों. त्यांस कविता आवडून त्यांनीं 'संग्रह कां काढीत नाहींस? म्हणून विचारलें आणि त्या दिशेनें त्यांनीं मला पुष्कळसा रस्ताही दाखवून दिला. आणि त्याचाच परिणाम म्हणजे रसिकांच्या हातीं मी 'वसंत-वैभव' देण्यास उद्युक्त झालों.

अर्थात् मीं शब्द टाकतांच त्यांनीं प्रस्तावना लिहून दिली. ही प्रस्तावना देण्याचे अगोदर ते कांहीं 'प्रकरणा'च्या कामांत व्यग्र होते हें मला माहीत आहे तरीही पण त्यांनीं आपुलकीनें व झटपटीनें ही विवेचक व विस्तृत प्रस्तावना दिली आहे. त्यांचे आभार मानणें हें नाटकी व औपचारिक होईल कारण त्यांनीं मी बी.ए.च्या

वर्गांत असल्यापासून माझ्यावर पुत्रवत् विशेष लोभ ठेवलेला आहे. ज्यांनीं मला सरस्वतीच्या मंदिरांतील दालनें दाखविलीं त्यांचेंच बोट धरून ह्या शारदेच्या मंदिरांत शिरतांना मला 'वाङ्मय-पोलिसां'ची बिलकूल भीति वाटत नाहीं आणि ज्यांनीं 'विज्ञानबोधा'ला प्रस्तावना लिहिली, ज्यांनीं बालकवींचें अंतरंग खोलून दाखविलें त्यांनींच 'वसंत-वैभवा'चाही परिचय करून द्यावा हा विचारही कमी अभिमानास्पद नाहीं. खरोखर त्यांच्या ऋणाचा मीं मोठाच वांटा उचलला आहे.

ह्या पुस्तकांतील कांहीं कवितांबद्दल खुलासा व्हावयास हवा. ह्यांतील कांहीं कविता 'ज्योत्स्नें'त 'वसंत' व 'निर्मल' ह्या नांवांखालीं प्रसिद्ध झाल्या आहेत आणि 'प्रतिभे घे बेफाम भरारी' ह्या कवितेला तर 'ज्योत्स्ने'च्या १९३८ च्या चढाओढींत पहिलें बक्षिसही मिळालें आहे. ह्या गौरवांबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. ह्या सर्व प्रसंगीं श्री. वा. रा. ढवळे (ह्यांचा माझा अद्याप प्रत्यक्ष परिचय झाला नसतांही) यांनीं जें सौहार्द दाखविलें त्याचा निर्देश न करणें कृतघ्नपणाचें ठरेल. पुस्तकाच्या ८१ व्या पानावरील कविता 'कलावन्त' (पूर्वीं ती गोष्ट मीं कुठेंतरी इंग्रजींत वाचली आहे पण कुठें तें नक्की आठवत नाहीं. म्हणून सांगावेंसें वाटतें कीं) श्री. अत्रे-घाटे यांच्या एका क्रमिक पुस्तकांतील 'शिल्पकार' ह्या गोष्टीवरून लिहिलेली आहे. मूळच्या हृदयस्पर्शी गोष्टीला फक्त छंदोबद्ध केल्याचें श्रेय माझें आहे. पान २८ वरील 'हिरवें पान' (व पुढील मित्रस्मृति, दिवंगत कवीस, पंखांत जोर..., समाधीशेजारीं) ह्या पांचही कविता माझे मित्र कै. श्रीनिवास कृष्ण पाटणकर, B.A. (Hons.). ह्यांचेवरील आहेत. आणि शेवटीं 'शांतिदूत' ह्या मीं

अगदीं अलीकडे लिहिलेल्या मुक्तछंदांतील कवितेच्या थोडयाशा भागाचा समावेश ह्या काव्याच्या वानगीदाखल केलेला आहे.

कवितेची निर्मिति जरी कवीच्या हृदयरंजनांत होत असली तरी तिची समाप्ति रसिकरंजनांतच होत असते असें कुणींसें—मला वाटतें डॉ. माधवराव पटवर्धनांनीं—म्हटलें आहे. मी त्यांच्याशीं सहमत आहें. आधुनिक कवितेच्या उपेक्षेच्या काळांतही माझा रसिकांवर भरवसा आहे. रसिकांना ती आवडली म्हणजे झालें.

'महाराष्ट्र-कवि-परंपरा–खण्ड न पडला तिला जरा'

हें खरें असलें तरी मला

'उणीव रसिकांचीच खरी–आज भासते खरोखरी'

हें खरें वाटत नाहीं.

शेवटीं, माझे प्रकाशक श्री. य. गो. जोशी ह्यांचा मी अत्यंत आभारी आहें. श्री. य. ग. वझे यांनीं छपाई चालू असतांना केलेली मदत स्मरणीय आहे.

नारळीपौर्णिमा
ता. २९।८।३९ इ.

रसिकांचा नम्र
**वसंत चिंधडे**

# प्रस्तावना

माझे विद्यार्थी मित्र श्री. वसंतराव चिन्धडे, बी.ए.(ऑनर्स) यांच्या कवितासंग्रहाचें स्वागत करतांना मला अतिशय हर्ष होत आहे. कॉलेजांत असतांना त्यांची एखादी एखादी कविता मला वाचावयास किंवा ऐकावयास सांपडली होती; व तीवरून त्यांच्या प्रतिभेच्या मधुरपणाचा प्रत्यय मला तेव्हांच आला होता. दरम्यानच्या काळांत विद्याभ्यासांत प्राप्त झालेलें समाधान, आणि यौवनांत पुष्ट होत आलेल्या प्रेमभावनेस परिस्फुटता देणारें अनुकूल वैवाहिक जीवन, यांच्या भरानें प्रतिभेला उत्कटता प्राप्त होऊन त्यांनीं पुष्कळच काव्य लिहिलें. त्यांतील कांहीं कवितांचा संग्रह 'वसंत वैभव' या छोट्याशा पुस्तकांत केलेला आहे. श्री. वसंतराव यांनीं या सर्व कविता मला म्हणून दाखविल्या आहेत. त्या ऐकत असतां, मूळचा अत्यंत मिष्ट असा रस संगीताच्या मिश्रणानें इतका सुरस झाला कीं कांहीं कविता त्यांच्याकडून मीं पुन्हां गाऊन घेतल्या. इतक्या लहान वयांत सौंदर्याचें इतकें विविध प्रकारचें दर्शन व्हावें व त्याचें चित्रणही इतक्या सफाईनें करण्याची करामत साधावी याचें मला खरोखरच नवल वाटलें. विनयशील वृत्तीमुळें त्यांची अत्यन्त रमणीय प्रतिभा त्यांच्या मित्रांच्यासुद्धां अगदीं ओझरतीच दृष्टीस पडली आहे. पण आतां या 'वैभवां'त तिचें शान्त, रेखीव, नाजूक पण बुद्धितेजानें चमकणारें व कलेचीं छायोपछायांचीं प्रावरणें पांघरलेलें रूप भरघोसपणें सर्वांसच पहावयास सापडेल. कवि 'वसंत' हे भीत भीत पुढें येत आहेत; व तें स्वाभाविक आहे. पण अनेक

कवींचीं काव्यें आत्मीयतेनें वाचलेला व त्यांचीं सौंदर्यें एका कटाक्षानें व पृथक् कटाक्षानें न्याहाळलेला म्हणून मी त्यांस आश्वासन देतों कीं त्यांना भीत भीत पुढें येण्याची कांहींच आवश्यकता नाहीं. 'आपरितोषात् विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम्' हें थोरामोठ्यांना सुद्धां सुटलें नाहीं हें खरें; पण त्या विद्वानांच्यापुढें येण्यास तरी धीर हवा. तो मी कवि वसंत यांना अवश्य देतों.

एखादें कवितेचें पुस्तक वाचावयास घेतलें असतां त्याच्या स्वरूपाचा अस्तिपक्षीं अथवा विधायक बाजूनें विचार करणें हें अत्यंत अवश्य आहे. कवीनें काय केलें नाहीं किंवा अमुक एका निराळ्या पद्धतीनें केलें असतें तर त्याचें काव्य कसें अधिक खुललें असतें आणि तो मोठा कवि या नांवाला कसा पात्र झाला असता हें सांगण्यांत कांहींच मतलब नाहीं. त्यानें सौंदर्य निर्माण केलेलें असलें म्हणजे त्याच्या काव्यावर आपलें मन लुब्ध व्हावयास पुरेसें कारण आहे असें समजावें. मूळांत त्यानें जर सौंदर्यच निर्माण केलेलें नसलें तर अवश्य तीच कला येथें दिसत नसल्यामुळें त्या कवीचा नाद सोडलेला बरा! पण जर हें सौंदर्य त्याच्या काव्यांत दिसत असलें तर त्यानें न केलेल्या बाबींचा विचार करून किंवा दुसरीं श्रेष्ठतर कलाङ्गें तुलनेस घेऊन त्याच्या काव्याचें अवलोकन व परीक्षण करणें हें बरोबर नाहीं. एखाद्यानें जर स्फुट कविता लिहिली असली तर त्यानें खंडकाव्य लिहिलें नाहीं असें म्हणणें आणि त्याच्यापुढें खंडकाव्याचा महिमा सांगणें हें अप्रशस्त आहे. एखाद्यानें खंडकाव्य लिहिलें असलें तर त्याच्यापुढें महाकाव्याचा डोलारा उभा करणें आणि त्याच्या मनानें तुझें काव्य कसें क्षुद्र आहे अशी जाणीव त्याला देणें ही खऱ्या टीकेची पद्धतीच नव्हे. जेव्हां एखादा लेखक

आपली वस्तु रसिकापुढें आणून मांडतो तेव्हां वाङ्मयांतील लहान-मोठ्या विविधप्रकरच्या नमुन्यांचा बाजार हे रसिक आपल्याभोंवतीं उभा करतील आणि त्या विचित्र शेजारधर्मानें आपल्या काव्याच्या लघुत्वाची प्रतीति आपल्याला प्राप्त करून देतील असें त्याला कधींच वाटत नाहीं. जें सौंदर्य ज्या पद्धतीनें व मानानें मीं उत्पन्न केलें आहे तें आपणांस कसें काय वाटतें, येवढेंच रसिकांना त्याचें विचारणें असतें.ही त्याच्या पृच्छेची प्रास्ताविक बैठक लक्षांत घेऊन रसिकानें त्याच्या कलाकृतीचा परामर्श घेतला पाहिजे.

पुष्कळदां असें होतेंही कीं लेखक हा ज्याच्याकडे येतो त्याच्या रसिकपणाला आपल्या रसाचें आवाहन पोंचतें का हें पहावयास येतो; पण ज्याच्याकडे तो आलेला असतो त्याला, हा त्याचा विचार लक्षांत घेऊन, त्याप्रमाणें उत्तराची भूमिका ठेवावी हें कळत नाहीं. त्याला अशी एक सूक्ष्म जाणीव असते कीं आपण कोणी श्रेष्ठ प्राणी आहों आणि हा गृहस्थ आपल्याकडे त्या नात्यानें आला आहे. म्हणून तो त्या लेखकाशीं बोलतांना वरिष्ठपणाची किंवा उपदेश-काची भूमिका घेतो आणि तुम्हीं असें केलें आहे त्यापेक्षां तसें केलें असतेंत तर जास्त चांगलें झालें असतें, किंवा तुम्हीं व्यक्त केला आहे हाच विचार शेक्सपीयर यानें किती सुंदर करून सांगितलेला आहे किंवा आपणा स्वतःलाच हा विचार मागें एकदां कसा सुचला होता व त्यावर आपण लिहिलेली कविता कशी अर्धवटच राहिलेली आहे, असें कांहींतरी सांगत बसतो. बिचारा कवि हा गृहस्थ मुद्द्याला केव्हां येईल याची वाट बघून बघून निराश होऊन परत जातो. वास्तविक सौंदर्यनिर्माता आणि रसिक यांच्या भूमिकांची ही मोठी गमतीची अदलाबदल झालेली असते. सौंदर्य निर्माण कर-

णारा ज्या वेळीं आपली सुंदर कृति रसिकांपुढें ठेवतो त्या वेळीं मीं निर्मिलेल्या सौंदर्याचें रूप याला नीट न्याहाळतां येऊन मीं अपेक्षिल्याप्रमाणें आनंद होतो का हें त्याला बघावयाचें असतें. तें सौंदर्य निर्माण करतांना मला स्वतःला जो आनंद झाला त्या आनंदाचा सहभागी हा रसिक आहे का हें त्याला पहावयाचें असतें. अर्थात् अपेक्षिलेला आनंद झाल्यानंतर हा रसिक जें अनुकूल मत देईल तें त्या कवीला निःसंशयच हवें असतें. पण सौंदर्यनिर्माता या नात्यानें त्याची अपेक्षा अशी असते कीं आपल्याला झालेला आनंद दुसऱ्या कोणाला होतो का हें पहावें. पण हा रसिक त्याच्या अपेक्षेचा अगदीं भंग करतो.

तो त्याला आपलाच महिमा सांगूं लागतो. वास्तविक पाहतां रसिकांचीच परीक्षा व्हावयाची असते. पण तो स्वतःलाच परीक्षक समजून सौंदर्य निर्माण करणाराला उंचावरून सल्ला देण्याचा अभिनिवेश दाखवितो. स्वाभाविकपणेंच त्या कवीचा अपेक्षाभंग होतो. अशा प्रकारचा अपेक्षाभंग रा. वसंतराव चिंधडे यांच्या बाबतींत मी होऊं देणार नाहीं !

त्यांच्या कवितेंत जो एक तऱ्हेचा हलुवारपणा आहे त्याला संभाळूनच जें काय बोलावयाचें तें बोललें पाहिजे. त्यांच्या अवलोकनांत जेथें कोठें बारीक बारीक रसाचे निर्झर त्यांना सांपडले तेथें त्या निर्झरांच्या कांठीं बसून त्या निर्झरांनीं चालविलेली मंजुळ गुणगुण कवीनें आपल्या काव्यांत उतरली आहे. हे रसाचे पाझर कसे आहेत तें पहा. प्रसूतिवेदना अनावर झालेल्या स्त्रीचें विव्हळणें घरांतून ऐकूं येत असतां कवीच्या मनाची काय चलबिचल झाली ती 'देवदूत' या कवितेमध्यें फार सुंदर रीतीनें व्यक्त केली

आहे. नेहमीं वाटेल तीं संकटें हसूनच सोसाणारी स्त्री आतां मृत्यूच्या दारांत बसली आहे; तिचे ते हाल पाहून पोटांतून कसा उमाळा येत आहे; तिचे हुंदके ऐकून प्रीतिवस्त्राच्या तांती मनाला कशा कांचत आहेत; मागें भोगलेलीं सुखें डोळ्यांपुढून स्मरणाच्या रूपानें झराझर निघून जात असतांना तेच डोळे आतां दुःखानें कसे भरून येत आहेत याचें कुशलपणानें केलेलें वर्णन वाचतां वाचतां एकदम ही दिंडी पुढें येते :

तोंच ताई येऊन वदे दारीं
"पुरे चिंता रे भीति सरे सारी
टाक पेढ्याचा घास ह्या मुखांत
घरा आला कीं आज देवदूत."

ही दिंडी वाचतांच मनांत सांचत आलेल्या चिंतेच्या विचाराचें रूपान्तर इतकें गोड होतें कीं,

घुमत सनया बाहेर अन् मनांत
घरा आला कीं आज देवदूत !

नवी नवरी गृहप्रवेश करतांना पतीच्या मनांत या आपल्या पत्नीला उद्देशून काय म्हणावयाचें असतें, पण जें कवि नसलेल्या पतीला म्हणतां येत नाहीं, तें आपल्या कवीनें 'भाग्यदेवता' या कवितेंत अत्यंत हृद्य रीतीनें सांगितलें आहे. कवितेची आस्थाईच कशी आहे पहा—

पातलीस भाग्यदेवताच माझिया घरीं
आणि मींहि स्थापिलें तुला मदीय अंतरीं

पण यापुढेंहि पत्नीच्या स्वरूपाचें आणि त्या प्रसंगानें तिच्या

मनांत उत्पन्न झालेल्या चलबिचलीचें कवीनें फार समर्पक चित्रण केलें आहे.

भाव गोड लोचनीं
हास्य मुग्ध आननीं
चंद्रिका झरेच लोचनांमधून ही भुरी !

येथें चंद्रिकेला 'भुरी' हें विशेषण लाविलें आहे तें पत्नीच्या बदामी रंगाच्या डोळ्यांचें निदर्शक असावें असा अजमास आहे !

भाल तें तुझें विशाल
शोभवीत घर्मजाल
बांधलीच कीं बिंदीही वरी कुणी तरी

यांतील अलंकारसुद्धां खुद्द बिंदीइतकाच मनोहर आहे हें कोणीही कबूल करील ! विवाहासंबंधीं बोलणें चालू असतां भावी वराच्या मनांत कशा प्रकारची उत्कंठा खेळत असते हें 'सखी' या सुंदर कवितेंत चांगलें फुलवून सांगितलें आहे. हा उत्कंठित तरुण म्हणतो

स्थापील मला अंतरीं
सखी ती असेल कोठें तरी !
मी हंसतां हांसेल ती
मी गातां गाईल ती
मी झुरतां स्फुंदेल ती
मला अनुसरील छायेपरी !... सखी ती.

हाच समभावनेचा तंतु कवीनें अगदीं शेवटपर्यंत पोहचविला आहे. या तीनही प्रसंगांत कवीनें ज्या रसनिर्झराच्या कांठीं बसून थोडेंसें गायन केलें आहे ते प्रसंग तरुण लोकांना लौकरच यावयाचे आहेत

म्हणून आणि पोक्त माणसांना त्यांची स्मृति अत्यंत सुखद वाटते म्हणून रसानें भरलेले आहेत असेंच दिसून येईल.

आपल्या इतिहासांतील प्राचीन वैभव पुन्हा पहावयास सांपडणार नाहीं हा अत्यंत दुःखप्रद विचार 'आजला कोठें तीं वैभवें'-या कवितेंत प्रसंगाचें चित्र डोळ्यापुढें अगदीं ठळठळीत उभें रहावें अशा सार्थ शब्दांनीं कवीनें सांगितला आहे.

झुली त्या अंगावर लोंबती
रुपेरी अंबारी शोभती ।
ते मत्त हस्ति जणुं ऐरावत भासती !
भव्यशा त्या अंबारींतुनि
पाहती भाग्यवंत वांकुनी ।
जातसे धुळीनें व्योमभाग व्यापुनी !
शोभती पेहराव भर्जरी
झळकती मोत्यांच्या झालरी ।
तो भरुनि राहिला प्रकाश कीं अंबरीं !

...................... ...

मिरवणुक चाले रस्त्यांतुनी
जयश्री आले जों घेउनी ।
तों 'कुणी' स्वागता सज्ज गवाक्षांतुनी !

कल्याणच्या सुभेदाराची स्त्री शिवाजीसमोर आणिली असतां त्या उदार वीरपुरुषानें जे उद्गार काढले त्यांचें गायनही कवीनें अत्यंत गंभीर तऱ्हेनें केलेलें आहे.

शिवराया कानीं घुमती तुझे थोर बोल
नभाहून तूं उदार

सागराहून गंभीर
वीणेहून हळुवार
तुझ्या तेजापुढें फिके सारे ग्रहगोल.

मातृभूमीची केविलवाणी अवस्था पाहून 'सौख्यासाठीं आईच्या' या काव्यांत कवीनें मोठे तडफदार विचार सांगितले आहेत.

| | |
|---|---|
| तुम्हां पाहुनी तापे रक्त | तुम्ही नीच चांडाळ ! |
| विटंबना तुमच्याच घरीं | आईची तुमच्याच. |
| उघड्या डोळ्यांनीं बघतां | खुशाल नंगा नाच ? |
| तुमच्याच जिनगानीवरती | नये उडवुं थुंकार ? |
| रहा इमानी रक्ताला | द्या तिजला हुंकार. |

आपल्या दिवंगत कविमित्रास उद्देशून कवीनें तीनचार कविता लिहिल्या आहेत. हा मित्र म्हणजे सर परशुरामभाऊ कॉलेजांतून ऑनर्स घेऊन पास झाल्यानंतर दोनचार महिन्यांच्या आंत मृत्यु· मुखीं पडलेला बिचवा विद्यार्थी **श्रीनिवास पाटणकर** हा होय. हा मुलगा स्वतः कवि असून मित्रमंडळांत अत्यंत प्रिय असे. त्याला उद्देशून आपला कवि म्हणतो--

गेलें गळुनी पान हिरवें गेलें गळुनि पान् ।
वेलीवरती लव डोकवलें
रक्तरंग लेवुनी हासलें
वाऱ्यासंगें जरा नाचलें
गुणगुणलें मधु-गान—हिरवें०
कळ्या कोंवळ्या तयास पाहुन
भुलल्या झुलल्या गेल्या मोहुन
सावलींत कीं त्याच्या राहुन

दिला तया बहुमान—हिरवें०
कितीक पानें वेलीवरती
पिकती, सडती, परी न पडती
वृथाच सळसळुनी फडफडती
जरी न अंगीं त्राण—हिरवें०
हेंच परंतू बिनपिकलेलें
वेलीवरुनी हाय गळालें
दवासवांनीं क्षणांत भिजलें
उजाड गमतें रान—हिरवें०

चित्र मधेंच कापलें जाऊं नये म्हणून थोडा लांब उतारा घेतला आहे. पण आपल्या प्रिय मित्राला नवरसानें भरलेलें 'हिरवें गार पान' अशी उपमा एकदां कवीनें घेतल्यानंतर ती त्यानें शेवटपर्यंत कशी पोहचविली आहे हें हीं चार कडवीं बारकाईनें वाचलीं असतां कळून येईल. "रक्तरंग लेवूनी हांसलें", "गुणगुलें मधु-गान", "हेंच परंतु बिनपिकलेलें वेलीवरूनि हाय गळालें" हें वर्णन पाटणकरांना किती अक्षरशः लागू आहे हें त्यांची ओळख असणाऱ्यांच्याच ध्यानीं येईल. "चंद्र आणि कुत्रा" या कवितेंत कवीनें अरसिकाला मारलेला वाधाडा अरसिकाच्या अंगावर कायमचा राहील असें मला वाटतें. या कवितेच्या शेवटीं कवि म्हणतो "चंद्र उगवला, भुंकतसे पाहून तया श्वान." थोडी परमार्थविचाराची चुणुकही कवीनें कवीच्या पद्धतीनें दाखविली आहे.

समोर डोंगर कायेचा कठोर
खेळवी निर्झर कोणी तरी
ग्रीष्म ऋतूंतील रखरखे ऊन

वृक्षा दे जीवन कोणी तरी
झाडावर कळ्या असूनियां बंद
ओतीतें सुगंध कोणी तरी
नभाच्या मंडपीं टांगतें झुंबर
सार्‍या रात्रभर कोणी तरी
.....................
कुणिही तें असो लवतसे मान
कराया वंदन तयालागीं

आणखी एक अभंग बघा:—

शोधूं कुठें तूज पुष्पांत सुगंध
तुझा देह गंध दरवळे
शोधूं कुठें तूज आकाशगंगा ही
मन माझें मोही हास्य तुझें
शोधूं कुठें तूज नभ तारायुक्त
...............
डोईचा मुकूट तुझ्या वाटे
तोंच कोणी वदे खुळ्या कां ही खंत
तुझ्या हृदयांत शोध मला

आणखी एक लहानसा उतारा घेऊन हा परमार्थ संपवितों. कवीची या प्रकरणांतील उत्कंठा कशी व्यक्त झाली आहे पहा.

उघड कवाडें निबिड अंधारीं
आलों तुझ्या दारीं अनायसा
उघड कवाडें मेघ गडगडे

चित्त धडधडे गर्जनेनें

.................

उघड कवाडें किती सविश्वास
तुझीया दारास पातलों मी
उघड कवाडें नाहीं उघडीत ?
बरा जीवनांत जीण्याहुनि !

कवीच्या प्रतिभेची भरारी "प्रतिभे, घे बेफाम भरारी" या कवितेंत थोड्या गोड बेफामपणानें व्यक्त झाली आहे. असें वाटतें कीं पुढला पुढला बंडखोर कवि मागल्या मागल्या बंडखोर कवींचीं हत्यारें मोडून टाकण्यांत सुख मानीत असावा. केशवसुत, टिळक इत्यादींच्या या बाबतींतील कविता सर्वांच्या परिचयाच्या आहेतच. आपला कवीसुद्धां विनयानें पण कसा जोरानें बोलतो आहे पहा :

सारंगी दे दूर फेंकुनी
टाक मोडूनी मंजुळ पावा
'तुतारीचाचि' स्वर ऐकावा
'रणशिंगाचा' साद श्रवावा
'झेंडा बंडाचाच' धरोनि,
येऊं दे लढण्यास हुशारी
तुटल्यावर या क्रूर शृंखला
जिंकल्यावरी प्रबल या खला
कलेस गा मग, मग प्रीतीला
अन् मग घे बेफाम भरारी

कवीनें 'पावा' मोडला आहे पण 'तुतारी आणि रणशिंग' यांचा उपयोग करून घेतला आहे व उपासमारीच्या शृंखला तुटल्यानंतर

मग कवीनें कला आणि प्रीति यांचीं गाणीं गावीं अशी इशारत कविवर्गास दिली आहे. अशाच प्रकारचा मानसिक अस्वास्थ्याचा विचार 'रे अजून नाहीं' या कवितेंत कवीनें सांगितला आहे. हीं प्रेमाचीं आणि कलेचीं रडगाणीं केव्हां संपणार असें कवीनें स्वतःसच विचारलें आहे.

संपणार केव्हां वाटे हीं रडगाणीं
स्फुरणार कधीं ती झुजारांची वाणी
कडकडाट होऊन येइल भूवर वीज
लागेल कधी तें जिवंत आतां पाणी ?

समाजसत्तावादाचें थोडेंसें वळण कवीच्या विचाराला लागल्याचें मला माहीत आहे व तें मानसिक अस्वास्थ्याच्या रूपानें दोन कवितांत कवीनें सांगितलें आहे. असो. रा. वसंतराव चिंधडे यांच्या कवितेचें सौंदर्य ध्यानांत यावें यासाठीं आतांपर्यंत थोडे थोडे उतारे घेतले व थोडें थोडें सूचनात्मक लिहिलें. त्यावरून या नवोदित कवीच्या प्रतिभेविषयीं व विचारसौष्ठवाविषयीं रसिकांचा अनुकूल अभिप्राय होईल असा मला बळकट भरंवसा आहे.

पण मोठमोठाल्या कवींचीं काव्यें आणि उदाहरणें कवीच्या पुढें असल्यानें अशा प्रकारचीं लहान लहान काव्यें लिहिणारांच्या मनांत थोडें असमाधान उत्पन्न होतें आणि कांहीं रसिकांच्या मनांत तरी त्यांच्याविषयीं सूक्ष्म अवहेलनेची बुद्धि डोकावते. हें कवींचें अस्वास्थ्य जावें आणि रसिकांचीही अवहेलनाबुद्धि लोपावी यासाठीं या मुद्या-संबंधानें थोडेंसें तरी विवेचन करणें प्रसंगोचित ठरेल असें वाटतें.

श्री. वसंतराव चिन्धडे यांनीं या ज्या स्फुट कविता लिहिलेल्या आहेत त्या वाचल्यानंतर समुद्राच्या कांठीं वाळवंटांतील नाट वेंच-

णाऱ्या मुलींची आठवण मला होते. समुद्राचा कांठ दोन्ही अंगांस दिसत असतो तेथपर्यंत अफाट वाळू पसरलेली असते. ह्या वाळूंत केवळ हात-पाय मोकळे करण्यासाठीं, उड्या मारण्यासाठीं किंवा कांहीं गुजगोष्टी करण्यासाठीं शेंकडों माणसें जमा झालेलीं असतात. पण प्रपंचांतील विचारानें आणि रागलोभानें ज्यांचीं मनें व्यग्र झालेलीं नसतात किंवा खिजलेलीं नसतात त्या परकर नेसलेल्या मुली ह्या वाळूंत आल्यानंतर निराळ्याच तऱ्हेनें व्यापृत होतात. एकमेकींच्या हातांत हात घालून त्या आपले पाय वाळूंत खोंचतात आणि कांठावरील काळ्याभोर पाषाणांशीं झिम्मा खेळणाऱ्या त्या समुद्राकडे पहात अगदीं निश्चलपणें उभ्या राहतात. आपापले हेवे-दावे बोलून दाखविणारे, बांधकामावर आपलीं पिचलेलीं हाडें पुन्हां शाबूत करावयासाठीं वाळवंटावर तेथेंच डोळे मिटून पसरलेले किंवा शुद्ध उल्लूपणानें जीविताचीं नाणीं भराभर उधळून टाकणारे असे जे कोणी तेथें भोंवतीं भोंवतीं असतात त्यांच्याकडे त्या मुलींचें लक्षच नसतें. समुद्राची शोभा पाहून त्या हर्षभरित होतात. आणि त्या विशाल सौंदर्यानें त्यांना लागलेली समाधि थोड्या वेळानें उतरली म्हणजे पायापाशींच असलेल्या छोट्या सौंदर्याकडे त्यांची दृष्टि जाते. थोड्या थोड्या अंतरावर मोठमोठाले रंगीबेरंगी शिंपले त्यांना सांपडतात आणि निळे, पांढरे, तांबूस असे गुळगुळीत दगड त्यांच्या हाताशीं लागतात. हे गोळा करतांना संध्याकाळच्या उन्हा-च्या तिरपींत दूर कोठेंतरी एखादा मोत्यासारखा पदार्थ चमकतो व त्या त्याच्याकडे धांवत जातात. जीविताच्या वाळवंटांत येऊन दाखल झालेल्या तरुण मनाचासुद्धां असाच व्यापार सूरू होतो. त्यांचें जगतांत चालू असलेल्या व्यवहारांकडे फारसें लक्ष जात नाहीं;

कारण त्यांचीं मनें सौंदर्यावर लुब्ध असतात. आपल्याला पुष्कळदां असें वाटतें कीं हे नवे नवे लहानगे कवि भोंवतालीं चाललेल्या रणधुमाळीकडे कसे मुळींच लक्ष देत नाहींत? हे आपल्या ठिकाणींच कसे गुंगत पडले आहेत? पण ह्याचें उत्तर मिळावयास फार दूर जावयास नको. आपली मूळची अपेक्षाच चूक असते. जो जसा आहे तसा तो नसावयास हवा होता आणि आपल्या पसंतीच्या कामाला योग्य असा तो असणें योग्य होतें अशी कांहीं चमत्कारिक अपेक्षा आपण बाळगतों. मागें एके ठिकाणीं ह्यासंबंधाचें विवेचन आलेंच आहे. तोच विचाराचा धागा येथेंही ध्यानांत घ्यावयास हवा. ज्या उदयोन्मुख कवींविषयीं आपण असें बोलतों त्यांच्या-संबंधानें एक चौकशी आपल्या मनाशीं ज्यानें त्यानें करावी. ती ही कीं, हे बालकवि खरोखरीचें सौंदर्य निर्माण करणारे आहेत कीं नाहींत? जर अशीं सौंदर्यें त्यांचे हातून निर्माण होत नसलीं तर मग वरील अवहेलनापर टीका त्यांना यथार्थपणें लागू पडते असें म्हणावयास हवें. पण जर का त्यांच्या हातून सौंदर्यनिर्मिति होत असली तर आपल्या घरच्याच रत्नांना आपण कवड्या समजून बाजूला टाकत आहों हें आपण ध्यानांत ठेवावयास हवें. हे फुकट गेलेले लोक नव्हत; उलट ज्या गोष्टी आपल्या दृष्टींतून फुकट गेल्या त्यांतील प्रच्छन्न आणि प्रसुप्त सौंदर्य भट्टी लावून आणि फूक मारून क्षणार्धांत बाहेर आणणारे हे जादूगार होत. आपल्याला जीं सौंदर्यें कधीं दिसलींच नाहींत पण जीं आपल्या अंगावरून मात्र खास गेलेलीं आहेत तीं बोटानें दाखवून देऊन प्रथम स्वतः त्यावर लुब्ध होऊन, मग त्यांवर लुब्ध होण्यास दुसऱ्याला शिकविणारे असे हे 'द्रष्टे' म्हणजे सूक्ष्मपणानें पहाणारे लोक असतात. समुद्रकांटच्या वाळूवर काळजीनें खंगत पड-

लेल्या म्हाताऱ्याला लाटांचा खडकाशीं चाललेला झिम्मा कधीं झिम्मा म्हणून दिसला होता का? दुरून येणारी मोठी लाट जों जों जवळ येते तों तों त्याच्या चित्ताला कधीं वाढती भरती आली होती का? हें कधींच झालेलें नाहीं. त्याचा हृत्कोश वाळलेला असतो; आणि प्रत्यक्ष शुक्राची चांदणी जरी त्याच्यापुढें येऊन ठेवली तरी तो हर्षभरानें आपले दोन हात कधीं पुढें करणार नाहीं. पण त्याच्या शेजारीं आणि त्याच्या वात्सल्यानें बद्ध झालेली वाळूंत खेळणारी जी त्याची मुलगी तिला मात्र सागराचें आमंत्रण तर पोचतेंच, पण तें फार दूरचें आणि अस्पष्ट असल्यानें, पायानजीक आणि आसपास जीं सौंदर्यें तिला दिसतात तीं गोळा करण्यांतच ती रमून जाते. खरो-खरीचें सौंदर्य निर्माण करणारे आपले वालकविसुद्धां विश्वरूप सौंदर्यानें चकित होऊन जातातच; पण हें सौंदर्य दूरचें आणि अस्पष्ट असल्यानें भोंवतालचें लहान लहान सोज्ज्वल सौंदर्य जमा करण्यांत मग्न झालेले असतात. म्हणून सौंदर्याची भक्ति करणाऱ्या ह्या बालकवींना आपण डावलतां उपयोगी नाहीं.

जीवितांतील निरनिराळे प्रसंग त्यांच्या भव्यपणामुळें मोठमोठ्या बुद्धिमान् माणसांच्या आणि पराक्रमी वीरांच्या मनांत जोरानें भरतात. आणि हे प्रसंग कसे निभावून न्यावे आणि उपस्थित प्रश्न कसे सोड-वावे ह्याची चिंता ह्या बुद्धिमान् आणि कर्त्या माणसांना लागलेली असते. पण ते त्या कामांत व्यग्र असतां त्यांना कोणी सौंदर्याचें दर्शन करविलें तर तें त्यांना हवें असतें. कोणी एखादें विनोदवचन बोलला तर तेंही त्यांना हवें असतें आणि म्हणून वीर-पुरुष आपल्या संगतींत, खुषमस्करे हें वाईट नांव मिळालेले कोटीबाज लोक आणि तोंडपुजे हें वाईट नांव मिळालेले सौंदर्यनिर्माते कवि, बाळगीत

असत हें आपणांस माहीत आहे. ते तर्कज्ञ आणि ते वीर हे मोठे खरे; पण तें त्यांचें मोठेपण सुद्धां आपल्या ठिकाणींच जणुं कांहीं हुरहूर बाळगितें कीं आपल्या समाधानाला आणखी कांहीं हवें आहे. तें हवें असलेलें आणखी कांहीं तरी, सौंदर्य उत्पन्न करणारा कवि त्यांना प्राप्त करून देतो. ज्यानें प्रत्यक्ष लढाई मारली असेल आणि रणांगणावर अनेक समरचमत्कार केले असतील त्यालासुद्धां त्या त्या प्रसंगांतील लहानमोठ्या सर्व सौंदर्यांचा मिळून एक मोठासा गेंद बनवून पोवाड्याच्या किंवा गीताच्या रूपानें आपल्यासमोर कोणीं आणून मांडिला तर अतिशय समाधान होतें. जो तो आपापल्यापरी बलिष्ठ असतो खरा, पण अपुरा असतो. कांहीं एक हवें असलेलें नसल्यामुळें त्याला चुकल्याचुकल्यासारखें वाटतें. साहस, प्रताप, वीरश्री, कर्तबगारी, तर्कशुद्ध विचारीपण हीं ज्यांना लाभलेलीं असतात, त्यांना त्या त्या गुणाचा उपयोग होतो व अभिमानही वाटतो. पण सौंदर्याची भूक अशा ह्या उग्र किंवा नीरस मनोभूमीलासुद्धां नेहमींच लागलेली असते. ही शमविण्याला जर कोणी सौंदर्यनिर्माता पुढें आला तर आपल्या मनाच्या विकलाङ्गांत योग्य ती भर घालून तें पूर्ण करणारा कोणी तरी भेटला असें त्यांस वाटतें; आणि हें वाटण्यांत त्यांना कसला अपमानही वाटत नाहीं. कारण मनुष्यत्वाच्या वरच्या वरच्या स्तवकांत, अजाणतपणें कां होईना, ते शिरलेले असतात आणि तेथून मानव्याच्या पूर्णतेचें शिखर त्यांना दृष्टिटप्प्यांत दिसत असतें. अर्थात् आपल्याला कशाची उणीव आहे हें त्यांच्या ध्यानांत येतें व म्हणून सौंदर्योपासकाचे ते खुषीनें मित्र बनतात. सौंदर्याची उपासना करणारा खुद्द कवि हा सुद्धां असाच असतो. तोही आपल्यापरी उच्च असतो. पण त्याच्या चित्ताला बलिष्ठ विचार आणि पराक्रम

ह्यांची भूक लागलेली असते. ते त्याच्यापाशीं प्रत्यक्ष नसतात, म्हणून हे गुण जेथें जेथें उत्कटत्वानें दिसतील तेथें तेथें दृष्टि खिळून जाते व हवें होतें तें सांपडलें व आपल्या मनुष्यत्वांत योग्य ती भर पडली ह्या विचारानें बेहोष होऊन आपल्या प्रकृतिस्वभावाला अनुसरून तो गाऊं लागतो व ह्यांत त्याला कसलाही अपमान वाटत नाहीं. असा हा सौंदर्यांचा महिमा आहे.

वयाच्या लहानपणींच हीं सौन्दर्यें गोळा करण्याची बुद्धि ज्यांना लाभली ते खरोखर धन्य होत. आपल्या व लोकांच्या जीवितांतील निरसता घालविणारे हे लोक टीकाकारांच्या उपहासास पुष्कळदां पात्र झालेले पाहून दुःख होतें. पण या उपहासाचें कारण स्पष्ट आहे. वैद्य कोण आणि वैदू कोण, शस्त्रक्रिया करणारे कोण आणि न्हावी कोण, विद्वान् पंडित कोण आणि शालजोडी पांघरलेला कोण, खरा उदात्त देशभक्त कोण आणि प्रत्येक चौकांत टाहो फोडणारा संधिसाधु कोण ह्याची आपल्या जीवितांत अगदीं गल्लत होऊन जाते आणि मग वैदूंना झालेले दंड वैद्यांना भरावे लागतात, न्हाव्यांना झालेल्या शिक्षा शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांना भोगाव्या लागतात, शाल-जोडीवाल्यांची झालेली फजिती पंडितांना गिळावी लागते आणि संधिसाधूंचा झालेला निषेध खऱ्या देशभक्तांना पदरांत घ्यावा लागतो. हीच गत खरे कवि व तोतये कवि यांच्या गल्लतीमुळें होते. एखाद्या धंद्यांत जर अस्सलांच्या विशेष अंगांचें अनुकरण सोपें असलें तर तोतयांची संख्या तेथें फारच माजते. कवींच्या बाबतींत असेंच झालें आहे. वृत्तबद्धता हें एक ठोकळ व निर्णायक असें काव्यलक्षण असल्यामुळें तेवढ्या सामग्रीच्या बळावर तोतये उत्पन्न होतात व मग ह्यांच्या निषेधास सिद्ध झालेल्या टीकाकारांचा मारा

खऱ्याखुऱ्या सौंदर्यनिर्मात्या कवींवर होऊं लागतो; आणि शेवटीं ज्या सामान्य लोकांचें अवधान इतकेंसें सूक्ष्म नसतें ते एकंदर कवींच्याविषयीं अवहेलनापर बोलूं लागतात. म्हणून ही बऱ्यावाइटाची, खऱ्याखोट्याची, अस्सलकमअस्सलाची सरमिसळ रसिकांनीं पुन्हां पुन्हां निवडली पाहिजे व खरें सौंदर्य उत्पन्न करणारे कवि वेंचून बाजूला काढून, बाकीच्या कविब्रुवांना म्हणजे कविब्रुवांना दूर पिटाळून दिलें पाहिजे. पण येवढ्यानें भागत नाहीं. हे जे अभिनव सौंदर्याचें रसिकांना दर्शन करविणारे बालकवि असतात त्यांना प्रोत्साहक वाटेल अशीच त्यांची जोपासना समाजानें करावी व ते समाजाचे अवश्य आणि उपकारक घटक या नात्यानेंच त्यांची संभावना समाजानें करावी. त्यांना गातां येत नसलें तर त्यांचीं काव्यें इतरांनीं श्रमविभाग म्हणून म्हणून दाखवावीं व त्यांची सामाजिक किंमत व दर्जा कोणत्याही कारणास्तव उतरवूं नये. असें प्रोत्साहन मिळण्यानें सृष्टीनें त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न केलेला अंकुर फोफावत जाईल. अर्थात् खरें बळ अंकुरांतच असलें पाहिजे. प्रोत्साहनानें थोडें साधेल. प्रोत्साहनानें थोडें साधतें हें खरें पण अवहेलनेनें मात्र फार नुकसान होतें. म्हणून रसिकांनीं यथायोग्य निवड करण्याची पद्धत ठेवण्यानें हें नुकसानही बंद होईल.

या बालकवींना स्फुट सौंदर्य पाहण्याचीच संवय फार असते हें खरें; कारण तेवढें सौंदर्य पहाण्याइतपतच शक्ति त्यांना असते. ते बारीक बारीक कविता लिहितात हा कांहीं त्यांचा दोष नसतो. रसिकांचा पेशा येवढाच असावा कीं त्यांच्या कृतींत सौंदर्य आहे कीं नाहीं हें पहावयाचें. पण आरंभीं एकदां सांगितल्याप्रमाणें जो मनुष्य जेवढा नसेल तेवढा तो नाहीं

असें म्हणण्याचा आपला आग्रह असतो. 'मी खूप मोठा आहें' असा आग्रह एखाद्या बटूनें धरला तर, 'तूं धिप्पाड राक्षस नाहींस' असें पटवून देऊन त्याला दूर सारणें हें योग्य होईल. पण जो रूपसुंदर, चिमुकला बटू, बटू म्हणूनच समोर आला त्याला 'राक्षस असे असतात, गंधर्व तसे असतात आणि किन्नर फारच सुरस गातात' असें सांगून हिणविण्याचें कांहींच कारण नाहीं. बालकवींचीं स्फुट व बारिक बारिक काव्यें वाचून त्याला महाकाव्याचा उतारा देणें हें अप्रशस्त आहे. महाकाव्य हें भव्य, उदात्त आणि गंभीर असतें आणि मानवी जीविताचा अत्यंत व्यापक असा आटोप करतें, हें त्यानेंसुद्धां ऐकलेलें असतें; किंबहुना इतरांबरोबर त्यानें तसलीं काव्यें वाचलेलींही असतात. पण त्याच्या मनाचा मगदूर अजून बळावलेला नसतो; त्याच्या मनाचें अव्यपात्र विश्वकटाहासारखें समावेशक झालेलें नसतें; त्याच्या कल्पनेचीं उड्डाणें म्हणजे वानरीच्या लहान पोराच्या उड्या असतात; शतयोजनविस्तीर्ण सागराची मजा पहात केलेलें मारुतीचें प्रचण्ड उड्डाण नसतें; पंख फडफडवून आपल्या आई-भोंवतीं त्याच्या कल्पनाशक्तीला रिंगण मारतां येतें पण गरुडाप्रमाणें अंतराळांत दूर झेपावत जाणें त्याला साध्य झालेलें नसतें. त्यानें आपलीं पंखें विस्फारून सूर्याच्या तेजाचा उबारा प्राप्त करून घेतलेला असतो पण प्रत्यक्ष सूर्याकडे अचल दृष्टि लावण्याचें आणि डोळे न दिपूं देतां त्याचें रूप न्याहाळण्याचें सामर्थ्य त्याला आलेलें नसतें. पण ह्या गोष्टी व्हावयास हव्या आहेत हें त्यास खचित कळलेलें असतें व आपणही असेंच मोठें व्हावें या आकांक्षेनें त्याच्या मनांत सामर्थ्याची जमवाजमव चाललेली असते. कोणी लोक स्फुट सौंदर्यावर छोट्या छोट्या कविता लिहिणारांना थोडेंसें

ह्मणून असें सांगतात कीं, 'छपन्न अलगुजें वाजविलीं तरी तुतारीचा ऐवज व्हावयाचा नाहीं'. त्यांचा म्हणावयाचा आशय असा कीं अलगूज वाजविणारे निराळे आणि तुतारीची गर्जना करून सगळें विश्व नादावून सोडणारे निराळे! हा त्यांचा अलंकार नीट समजावून घेतला पाहिजे. पुष्कळ कवि असे असतात कीं जे लहानपणीं अलगूज वाजवीत होते, तरुणपणीं अलगूजच वाजवीत राहिले व अलगूज वाजवितां वाजवितांच मरून गेले, त्यांना तुतारीचें बळ केव्हांच लाधलें नाहीं, असें त्यांस म्हणावयाचें असतें. आतां अलगुजें वाजवीतच कोणी नाहींसे झाले तरी त्यांत कांहीं वाईट नाहीं. कारण तुतारीची गर्जना जशी अलगुजांत नसते तशी अलगुजाची माधुरी तुतारींत नसते. पण हें खरें असलें तरी प्रौढपणीं ज्यांनीं तुताऱ्या वाजविल्या, ते लहानपणींसुद्धां तुताऱ्या वाजवीतच आले हें मात्र खरें नाहीं. ते आपल्या लहानपणीं अलगुजेंच वाजवीत होते. महाकाव्यें रचणारे आणि मनुष्ययोनीला अलंकार होऊन राहिलेले जे भव्य रूपधारी कवि ते लहानपणीं सौंदर्यें गोळा करण्यांत आणि लहान लहान कविता लिहिण्यांत गुंग असत. म्हणून आपल्यापुढें जे नवीन कवि असतील त्यांनीं सौंदर्य-निर्मितीचा विसार समाजाला दिला असला म्हणजे समाजानें संतुष्ट असावें. ज्यांच्या आगमनाची आपण नेहमींच वाट पाहतों तशा प्रकारचे मोठमोठे कवि याच लोकांतून उभे राहण्याचा संभव असतो.

अशा प्रकारचा विसार आपले मित्र रा. वसंतराव चिंधडे यांनीं या पुस्तकांत निःसंशय दिला आहे. त्यांच्या प्रत्येक कवितेंत एक विशेष प्रकारचें चमकदार सौंदर्य आहे. या सौंदर्याला अत्यंत मधुर अशा ध्वनीचा परिवेष आहे. वाचकाला थोडी संगीताची लज्जत

असली तर व्यक्त केलेल्या कल्पनांची मोठी गोड पकड त्याच्या मनावर बसावी अशी विचारांची व शब्दांची योजना आहे. तारुण्यसुलभ असा जो प्रेमविकार त्यांतच जरी कवीचें मन रमून गेलेलें दिसलें, तरी शृंगार म्हणजे काय आणि कामुकता म्हणजे काय याचा सूक्ष्म विवेक कवीनें सर्वत्र दाखविला आहे. शिवाय या रसांतून बाहेर पडून सौंदर्यशोधनाच्या आपल्या व्यवसायाला वश होऊन तो अनेक रसक्षेत्रांत मौजेनें फिरत असलेला दिसतो; आणि हें सर्व करीत असतांना सदभिरुचि, मर्यादा आणि सौंदर्याचें केवळ मनोज्ञ दर्शन येवढ्याच बळावर त्यानें आपल्या कवितेला मोहकता आणली आहे. मला लिहावयास संकोच वाटत नाहीं कीं पुष्कळ दिवसांनंतर अशा चांगल्या कविता मला वाचावयास व ऐकावयास सांपडल्या.

१–९–३९
टिळक रस्ता, पुणें

श्रीपाद महादेव माटे

मराठी ग्रंथ संग्रहालय

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | —रे ! अजून नाहीं— ! | १ |
| २ | सहानुभूति— ! | ३ |
| ३ | चन्द्र आणि कुत्रा— ! | ४ |
| ४ | पश्चात्ताप— | ५ |
| ५ | तारे अंधुकले... | ६ |
| ६ | भास— ! | ७ |
| ७ | रङ्गारी— ! | ८ |
| ८ | कोकिळास— | ९ |
| ९ | कीं 'आपण बंदी'— ! | ११ |
| १० | आजला कोठें तीं वैभवें !— | १२ |
| ११ | स्मारकें— ! | १३ |
| १२ | बंधनें हीं...? | १४ |
| १३ | दार खुलें केलें— ! | १६ |
| १४ | अजुन कशी नयनींची नीज !— | १७ |
| १५ | सौख्यासाठीं आईच्या— ! | १८ |
| १६ | देवी जयश्री ! | २० |
| १७ | कल्याणी-गीत— ! | २१ |
| १८ | बंदिवान् गरुड— ! | २२ |
| १९ | सीता-गीत— ! | २४ |

२० गोड पांवा वाजवीं— ! . . . . २६
२१ माझे कापुन पंख... . . . . २७
२२ हिरवें पान— ! . . . . . २८
२३ मित्र-स्मृति— ! . . . . २९
२४ दिवंगत कवीस— . . . . ३०
२५ पंखांत जोर... ! . . . . ३२
२६ समाधीशेजारीं— ! . . . . ३३
२७ प्रीति-देवता— ! . . . . ३४
२८ शशिकले !— . . . . ३५
२९ अव्यक्त प्रेम— ! . . . . ३७
३० चन्दा-राणी— ! . . . . ३८
३१ ओढणी— ! . . . . . ३८
३२ स्वप्न-मालेंतून... ! . . . . ४०
३३ सौंदर्य-पूजा— ! . . . . ४१
३४ साफल्य— ! . . . . . ४२
३५ होऊन धुन्द... ! . . . . ४३
३६ येथून पुढें चान्दणें— ! . . . . ४४
३७ ज्योत्स्ना-गीत— ! . . . . ४५
३८ दोन संक्रमणें— . . . . ४६
३९ रसिका— ! . . . . . ४८
४० मानिनीस— ! . . . . . ४९
४१ मेनके— ! . . . . . ५१
४२ हाय ! कोठें तुझा कण्ठ— ! . . . ५१

४३ अनुरागी— ! . . . . . ५३
४४ दोन पत्रिका— ! . . . . ५४
४५ तुला वाटेलच 'धन्य'— ! . . . ५६
४६ दैवी सूत्र— ! . . . . . ५७
४७ वठलेला वृक्ष— ! . . . . ५८
४८ मी जरा थबकतों... ! . . . . ५९
४९ निशा-गीत— ! . . . . ६१
५० संपादणी— ! . . . . . ६२
५१ निवेल प्रीति कशी— ? . . . . ६३
५२ जाईच्या कळ्या — ! . . . . ६५
५३ शीर्ण फुलांमधीं... ! . . . . ६६
५४ मी तुला गाणार— ! . . . . ६७
५५ अभागिनी— ! . . . . . ६८
५६ दूरचा दिवा !— . . . . ७०
५७ सखी— ! . . . . . ७१
५८ भाग्य-देवता— ! . . . . ७३
५९ निरोप घेतांना— ! . . . . ७४
६० देव-दूत— ! . . . . . ७६
६१ अुषा-गीत— ! . . . . . ७८
६२ स्वप्न-संगीत— ! . . . . ७९
६३ कलावन्त— ! . . . . . ८१
६४ कोणीतरी— ! . . . . . ८३
६५ शोधूं कुठें तूज— ! . . . . ८४

६६ कधींतरी— ! . . . . . ८५
६७ आतां कां उशीर ! . . . . ८६
६८ अुघड कवाडें— ! . . . . ८७
६९ प्रतिभे ! घे बेफाम भरारी— ! . . . ८८
७० शान्तिदूत . . . . . ९४

—×—

# वसंत-वैभव

## —रे ! अजून नाहीं—!

—रे ! अजून नाहीं कळी अुमलली पुरती
रे ! अजून नाहीं धुकें अुसळलें वरती
        नाहींच अुलटली अजून पहिली रात
अुद्दाम अुफळली नाहीं अजुनी स्फूर्ती !
फुटली न अजूनहि नवीन पुढती वाट
अजुनी न दूरवरची ये कानीं घांट
        जे गेले त्यांच्या टाकुन पाअुलं पायीं
म्हणतसें पोपटापरि पढलेलें पाठ !
मज वेड फुलांचें, चन्द्राचें, तारांचें
सौंन्दर्य बघुनी माझें मानस नाचे
        प्रस्फुरती केव्हां प्रेमाचें मधु बोल
अजुनी न पवाडे म्हटले झुंजारांचें !
घाणीस जुम्पला बैल, बान्धिले डोळे
तीच ती खालची वाट सरळ चोखाळे
        जूं तोडुन फेंकायाची आलि न शक्ती
बान्धिलें पायिंचें वाजवि घुंगुरवाळे !
लाभली न अजुनी गरुडाची मज दृष्टी

लाभली न चण्डोलाची गायन-वृष्टी
कोठून गवसणी घालूं आकाशास ?
ठाऊक हिण्डणें अेक धरेच्या पृष्ठीं !
मज कुठें गवसली प्रीतीचीच सतार
पडलें नि तिजवरी बोट चुकुन हळुवार
तों अुठे झंकृती, झालें अन्तर जागें
अन् तिचीच वसतों आतां छेडित तार !
मज केव्हां वाटे, गावें सुन्दर बोल
अजुनी न समेवर जुळून ये परि ताल
अन्तरांत तों ह्या तडफडतें, फडफडतें
अन् होत कुठेंशी आंत वेदना खोल !
संपणार केव्हां वाटे हीं रड-गाणीं
स्फुरणार कधीं ती झुंजारांची वाणी
कडकडाट होअुन येअिल भूवर वीज
लागेल कधीं तें जिवन्त आतां पाणी ?
ही जावो अुलटुन आतां लवकर रात
क्षितिजावर अुजळो लवकर दिव्य पहाट
झाडून पङ्ख फडफडा अुंच जाअीन
दशदिशा जागविन मधु अुर्जस्वल गात ! !

सङ्गमनेर, १०–३–३९.

## सहानुभूति——!

[जाति : भूपतिवैभव

ये दुःखी जीवा ह्या अुघड्या बाहूंत
तें धगधगणारें हृदय कराया शान्त
वाहल्या अश्रुंनां देण्या पूर्ण विराम
टाकुनी मान ह्या हृदयीं, घे आराम !

हें काय परन्तू ?— टेकतांच तूं माथा
कां पुन्हां हुन्दके नवे अुसळती आतां ?
कां झरझर वाहे पुन्हां अश्रुचा ओघ ?
कां पुन्हां दाटती शरद्-ऋतूंतिल मेघ ?

कीं, अशाच स्फुन्दन-शिम्पा तूं प्रकटूं दे
अन् अशींच त्यामधिं खुलव अश्रुचीं मोत्यें !
सांठवीन मी तीं हृदय-सागरीं माझ्या
चढवीन त्यावरी दिपवियणाऱ्या तेजा !

मग भरून माझा येअिल हळवा अूर
तुज गुङ्गविणारे अुठतिल त्यांतुन सूर ! !

मालेगांव, ४–११–३५.

## चन्द्र आणि कुत्रा—!

[जाति : चंद्रकांत

हा सरला काळोख आणखी चन्द्र वरी आला !
काय घालितो न्हाणूं शीतलतेनें जगताला ?
मी नव्हतें पाहिलें कधींही असें बिम्ब लाल
पानांच्या जाळींतुन गुम्फित धवल किरण-जाल !
शाल पांघरुन विश्व झोंपलें ह्या मायेखालीं
चन्द्रानें अंगाअी-गीतें काय त्यास म्हटलीं ?
काय तरी आकाश जाहलें असें सान्द्र नील
चहूंकडे अुधळणें शान्तता चन्द्राचें शील !
जगतावर सांडतात किरणें माझ्याही हृदयीं
आणि गल्बला शान्त आंतला जरा तरी होअी !

चन्द्र अुगवला, भुंकतसे पाहून तया श्वान
—आणिक चन्द्राकडे पाहतों मीही हांसून !!

मालेगांव, ११–४–३१.

[library stamps]

## पश्चात्ताप—

[छंद : ओवी

“अूड अूड पांखरा रे ! अुंच अुंच नभीं वर
नभोऽगण अुणें कर”
असें कसें सांगू तुला ? मीच तुला विद्ध केला
तीर अुरांत मारिला !
तीर अुरांत शीरतां कोसळुनी भूमीवरी
आली तूज तिरीमिरी !
पंख जोमें आपटशी पाखडशी प्राण सख्या !
शापिशी कीं मज, मुक्या !
शाप ! शाप ! मज असा कळूं दे अन् माझें पाप
होअूं दे रे पश्चात्ताप !
मुक्या पामराला तुला फुका मारिला रे तीर
पश्चात्तापें तापे शीर !
कळवळे आतां हृदय पाहोनियां तळमळ !
लोचनांत येतें जळ !!
तुझी वासलेली चोंच नयनांत अश्रू आणी
घालितो मी तींत पाणी
अश्रूंचें ह्या; पिअूनी तें होअूनिया रे ! हुशार
चढ पुन्हां नभीं वर !

नाशिक, १८–११–३४.

## तारे अंधुकले........

[वृत्त : शा. वि.—सुनीत

तारे अन्धुकले म्हणून बुडतां शोकीं कशाला असें ?
देखा हे अुघडून नेत्र, क्षितिजीं लागे फुटूं तांबडें
हा वारा अुठला ! तयास भरलें न्यारेंच कांहीं पिसें
पुष्पांतील लुटून गंध अुधळी अुल्हास चोंहींकडे !
चंद्राच्या वदनावरी पसरली आतां क्षयाची छटा
वेड्यांनो ! म्हणुनी कशास पिटितां छाती स्वतःची अशी ?
पूर्वेच्या क्षितिजावरी झगझगे हा लालसा बावटा
त्याचें काय कराल स्वागत तुम्ही वृत्ती धरोनी पिशी !
आतां ती विसरा अुबाळ गुपितें त्या पूर्व-रात्रींतलीं
अन् आतां विसरा विकारमय तीं ज्योत्स्नेतलीं क्रीडितें
कां हो बावरतां द्युतीहि सरतां त्या शुक्र-ताऱ्यांतली ?
तेजोलोप असा बघून हृदयीं काहूर कां दाटतें ?
तेजाचा फुटलाच बांध क्षितिजीं ! गाणीं यशाचीं म्हणा
अर्पा अर्घ्यहि क्रान्तिकारक अतां ह्या सूर्यनारायणा !!

पुणें, १५–१–३९.

## भास—!

[जाति : मनमोहन

छळिती वारंवार हाय ! हें हृदयाला आभास !
        पाहुनीयां दूर पाणी
        व्याकुळावें जैं मृगांनीं
अन् अथाङ्ग दर्या मुळीं न शमवी तृष्णार्तांची प्यास !
        काञ्चनाचें मृग बघावें
        विंधण्या त्यांना पळावें
धावतां जिवाला अुलट लागती दुर्दैवाचे फांस—!
        अुंच बांधावें मनोरे
        आणि फुलवावे फुलोरे
ह्या मनोरथांचा भंगुन जाअी परी क्षणामधिं आंस—
        दावितें जीवा जिव्हाळा
        लोपवी जी धूर-ज्वाळा
मुग्धच कन्या परि ती होअी परकीयाचा न्यास !
        भाकरी अश्रूंत भिजली
        आग पोटींची न विझली
दूरच पक्वान्नांच्या राशी; मिळे न पुरता घांस—
        सोनियाची कुठें नगरी
        कुठें झाडी आणि डगरी

हीं वसुधा-गौरीपुढें मांडिली काळानें आरास ?
दिव्य कांहींतरि बघावें
आणि बघुनी व्याकुळावें !
अन् परतावें दुबळ्या जीवें टाकित जड निःश्वास ! !

मालेगांव, २१–३–३७.

## रङ्गारी —!

पहा अुधळितो रङ्ग कसा हा पहा अुधळितो रङ्ग
निळे, सुनेरी, हिरवे, पिवळे
लाल, गुलाली, धवल, जांभळे
गहिरे, भुरके, शान्त, आगळे
बने पूर्ण निस्संग ! कसा हा ....
फळाफुलावर, लता-तरुवर
नदीझऱ्यावर, गिरीदरीवर
चराचरावर, स्वर्गधरेवर
रंग-खेलनीं दंग ! कसा हा ....
रंगपंचमी खुलवि प्रभातीं
रंगित नगरी हंसवि दिनान्तीं
दिवसरात्रभर रंग-संगती

जुळविण्यांत हा गुंग ! कसा हा ....
आणि रंगवी धवल कीर्तिला
खुलवि गुलाली धृति-प्रीतीला
श्वेत शान्तिला, लाल क्रान्तिला
श्यामल दास्य-तुरुंग ! कसा हा ....
गालावर तरुणींच्या खुलवी
डोळ्यांमधि बाळांच्या खेळवि
प्रिय-जन-हृदयीं, गानीं भरवी
रंगवि पूर्ण अनंग ! कसा हा ....
हंसवित किरणें हीं सोनेरी
इंद्र-धनुष्यांतही रंग भरि
खराखुरा अद्भुत रंगारी
पहा, उधळितो रंग ! कसा हा ...

ग्रंथ संग्रह ... ता. ... ठाणें.

मालेगांव, १९–५–३९.

## कोकिळास—

कशास घेउनि मंजुळ ताना शिणविसि आतां गळा !
संपला वसन्त रे कोकिळा !!
थांबला वाहणें वायू तो मंदसा

दशदिशांत नेई सुगंध जो धुंदसा
हांसतें न आतां मुग्ध मधुरशी अुषा !
फुलाफुलावर वर्षाऋतुची पसरलीच अवकळा !
संपला वसंत रे कोकिळा ! !
दिसतें न तारका-मंडित तें अंबर
लोपले शशीचे मेघामागें कर
ये पर्जन्याची मात्र सरीवर सर !
आणि येअुनी पूर, मलिनता आली ओहळ-जळा !
संपला वसंत रे कोकिळा ! !
धांवते मेघ हे धरेवरी वर्षती
तों पानांवरुनी थेंब थेंब ठिबकती
जणुं वसंत सरला म्हणुनि अश्रु ढाळिती ! !
अन् आम्रांचा तर कधींच झडला मोहर तो कोवळा !
संपला वसंत रे कोकिळा ! !
कां अुगाच गाशी मंजुळ तुझिया स्वनीं
जो कानीं येती तानांचे तव ध्वनी
चलबिचल होत तीं हळव्या माझ्या मनीं !
जा जा लवकर ! शिशिर ना तरी गोठवील तव गळा !
संपला वसंत रे कोकिळा ! !

पुणें, १०–८–३५.

## कीं 'आपण बंदी'—!

[वृत्त : भिल्लीण दिंडकी

हा तीर अुरीं खोल रुते भोंवळ येअी — येतात कळाही
हें शल्य करी अश्रूंची लोचनिं गर्दी — कीं आपण बंदी !
स्वप्नांत कधीं दचकावें आणि अुठावें — चित्तांत झुरावें
तों कंटक-शय्याच बने मखमल-गादी — अन् आपण बंदी !
प्रासाद कशाचे ? कसले दीप विजेचे ? — ते छंद मजेचे
होतों जरि राजे, बनलों आजच प्यादी — कीं आपण बंदी !
भालेहि कुठें ? खड्ग कुठें, चिलखत, ढाली ? — शाली नि दुशाली
दे जाणिव ही गोणीही अवजड खांदीं — कीं आपण बंदी !
हें कापित काळीज कशा जात विषारी — ह्या शब्द-कट्यारी
आवाज घुमे बेड्यांच्या खळ्खळ नादीं — कीं आपण बंदी !
अंधार किती दाटत हा आणि सभोंतीं — चित्तांतहि खंती
'हें काय जिणें ?' सांगत येथीलच भिंती — कीं आपण बंदी !
अन् फांस कसे लागत हे हाय ! गळ्याला जैं मीन गळाला !
ये बोल नशीबीं श्रवणें अंतर-भेदी — कीं आपण बंदी !!
ह्याहून जिणें फार बरें तें नरकींचें — —स्वातंत्र्य-सुखाचें !
आला न कसा मृत्यू हें श्रवण्या-आधीं ? — कीं आपण बंदी !

पुणें, २१-३-३८.

## आजला कोठें तीं वैभवें ?— [जाति : कञ्चनी

झुली त्या अंगावर लोंबती
रुपेरी अंबाऱ्या शोभती
ते मस्त हत्ति जणुं ऐरावत भासती !
भव्यशा त्या अंबाऱ्यांतुनी
पाहती भाग्यवंत वांकुनी
जातसे धुळीनें व्योम-भाग व्यापुनी !
शोभती पेहराव भर्जरी
झळकती मोत्यांच्या झालरी
तों भरुन राहिला प्रकाश कीं अंबरीं !
दुंदुभी सभोंवार गर्जती
तयानें दिशा-दिशा नादती
अन् जयजयकाराचेहि शब्द अुमटती !
वाजती कोठें ते हलकडे
कुठें ती भेरी मधुनी झडे !
सनअीला देती साथ आणि चौघडे ! !
मिरवणुक चाले रस्त्यांतुनी
जयःश्री आले जों घेअुनी
तों 'कुणी' स्वागता सज्ज गवाक्षांतुनी !

—आजला कोठें तीं वैभवें ?
त्यांचिया जराशाहि आठवे
नयनांत लोटती घळघळ कीं आंसवें !
आम्हां दुर्दैव्याचे, पुन्हां
दृश्य तें दिसेल का लोचनां ?
होतील स्पष्ट त्या बुजलेल्या का खुणा ?

**पुणें, ७–१–३७.**

## स्मारकें—! [जाति : मञ्जरी

भंगुनी तटांचे आतां जाती चिरे
हे खडे बुरुज तरि हताश वीरापरी—
चारही दिशांवर तोफा ह्या रोखल्या
चालल्या गंजुनी; दारू-गोळा कुठें ?
चहुंकडे वाळती गवतें फोंफावलीं
घोंघावत हिंडे वारा वेड्यापरी !—

स्फूर्तीचें वारें असेंच अंगांतुनी
संचरलें पूर्वी वीर-वरांच्या इथें !
अन् इथेंच घुमला तुतारीचा जो ध्वनी
नाचलीं कबन्धें रण-रंगी रंगलीं

येथेंच सलामी शत-तोफांची झडे
जों आले 'राजे' गनीम जिंकूनियां—

हा अुभा बापडा आतां दीनापरी
लोपलीं वैभवें—दैना नच पाहवे !
"भूकम्प होअुनी क्षणांत हा कोसळो
परि युगानुयुग हें नको असें खंगणें"
हा विचार छळितो मनास अेका परी
मन दुसरें बोले हळूच निश्वासुनी—

"हीं जिवंत अमुच्या स्फूर्तीचीं स्मारकें
अितिहास आमुचा अिथेंच रे, वाच तूं !"—

पुणें, ४–१२–३७.

## बंधनें हीं........?

[जाति : दिण्डी

नित्य आकाशाकडे ह्या बघावें
आणि बघुनी त्यां अंतरीं झुरावें !
स्वैर विहरावें नभीं असें वाटे
बंध मार्गीं परि हे कितीक मोठे !
मुक्त व्हाया त्यांतून धडपडावें
तोंच शल्यासम ते उरी रुतावे !

जात-भाअी मम अुंच नभीं जाती
गोड गानांच्या सरी वर्षताती
भाग्य आलें हें मात्र नशीबीं ह्या
पारतंत्र्यीं पिचणार हाय ! काया.
गोड गाणीं मी कुठुन वर्षणार ?
तींच कारण मीं विसरलोंहि पार
आणि रमलों ह्या वेदगायनांत
वेदगायन ? छे, वेड-गायनांत !

जातभाअी कुणि पिंजऱ्यासमोर
येति बोलविती विहरण्यास दूर !
पंख फडफडती घ्यावया भरारी
बंध तों हे किति टोचती जिव्हारीं
तोंच गेलेले तेहि दिसति दूर
—आणि लोटे ह्या नयनिं अश्रु-पूर !

चोंच चोंचित घालून अहा ! केव्हां
प्रियेसह मम जाअीन घरा देवा ?
पंख पंखीं अडकवुन अर्भकांच्या
नव्या मौजा लुटणार कधिं नभींच्या !
बंधनें हीं तुटणार तरी केव्हां ?
आणि सौख्याचा लाभणार ठेवा !

नित्य आकाशाकडे ह्या बघावें
आणि बघुनी त्या-अंतरीं झुरावें ?

नाशिक, २१-११-३४.

## दार खुलें केलें—! [जाति : मोहिनी

दार खुलें केलें तरि कां जासि नच अुडून ?
काय सौख्य स्वातंत्र्याचें जासि विस्मरून ?
पसरलें चहूंबाजूंला नभ किती अफाट
कोठलीहि कांपायाला नसे विकट वाट !
चालला ढगांवर रविचा विविध-रंगिं थाट
मार पंख, जाअीं अुंच दूर भरारून !
सृष्टि-सुंदरी ही अुंची पांघरून शेला
आगळाच देहावरचा दाखवी तजेला
केश-पाशिं अपुल्या खोंवी मुग्ध पुष्प-माला
टाकिले तिनें हे सारे आम्र मोहरून !
चाख, तर्र झालीं बघ कीं हीं फळें रसांनीं
डंवरलीं पहा हीं शेतें सस्य-शामलांनीं
ही निसर्ग-देवी नांदे येथ शान्त रानीं
तुझ्या मंजु गानें टाकी प्रान्त हा भरून !

दार बंद असतां—कितिदां हेरिलें अभाळ
सेविलीं न, दिधलीं तुजला जीं फळें रसाळ
गुंफिलीस अश्रूंचीं तूं कितीकदां माळ
पिंजरा पिसांनीं भरिला पंख पाखडून !
दार खुलें केलें आतां घे जरा हुशारी
आणि नभीं तीरा-ऐसी घेच रे भरारी
बंध पारतंत्र्याचे हे निखळले विषारी
अजुन शान्त कैसा ? जाशी नच त्वरा करून ?
अतां काय जरिही अुघडीं हीं सताड दारें
अतां काय घालुन फुंकर ? लोपले निखारे !
अतां काय अुमलुन सुमनें ? स्तब्ध होत वारे
लोपलीच पंखांमधली शक्ति ती झुरून !

पुणें, २४-७-३७.

## अजुन कशी नयनींची नीज ?— [जाति : रातकिडे

अुडतें ना अजुन कशी नयनींची नीज—
पोखरुनी दुबळे तव होत जरी काळीज ?
ल्याया ना वस्त्र पुरें—तीं अुघडीं अंगें
खाया ना अन्न पुरें, गलित देह सांगे

ही कंटक-शय्या तुज गमते सुम-शेज ?
हा जीवन-कलह सदा बाजूला चाले
खड्ग कुणा हातीं अन् करिं कोणाच्या भाले
लोभे जिव स्वप्नांतिल लुटण्या तरि मौज ?
कीं होउन मेघ तूंच वर्षिलेंस पाणी
तप्त धरा शान्तविली अेकदां जलांनीं
थिजली तव अंगांतील सळसळती वीज ?
अुदया बघ ! तो शशांक पश्चिमेंत आला
चंदेरी सोडुनि कर खुलवि नभःश्रीला !
अवसाचि तुज गमते ही आली जरि वीज ?
तो समोर देख ! अुभा ध्येयाचा किल्ला
फडकवणें ध्वज तेथें गांठुन शिखराला
झोंपुन होणार कसें ईप्सित काबीज ? //

मालेगांव, २१-१२-३४.

## सौख्यासाठीं आईच्या—!

[वृत्त : दोहा

आओी तुमची घरीं रडे तरी न तुम्हां खंत ?
भरिले कीं हातांत चुडे ? जाहलांत दुष्यन्त् !
प्रेमिकहि जरि हो दुष्यन्त होता तोच नृ-पाल्

तुमच्याइतुका त्यानेंही मुठिं न सोडिला ताळ् !
जिनें तुम्हांला जन्म दिला तिची अशी आबाळ् ?
तुम्हां पाहुनी तापे रक्त तुम्ही नीच चाण्डाळ् !
विटंबना तुमच्याच घरीं आओची तुमच्याच्
अुघड्या डोळ्यांनीं बघतां खुशाल नंगा नाच् ?
तुमच्या जिनगानींवरती नये अुडवुं 'थुं'कार ?
रहा इमानी रक्ताला ! द्या तिजला हुंकार् !
वाघांचे बच्चे होतां झालां गोगलगाय् ?
तुमची अन् तुमच्याच घरीं माय मोकली धाय् !
कीं मेलेल्या आओचें तुम्ही प्यायलां दूध् ?
चवतळलेला वाघ जसा तसे न होतां क्रुद्ध् !
आओचे निघतात जिथें धिंडवडे हे नीच्
तिथें सुखाचा, अुन्नतिचा नुगवे सूर्य कधींच् !!
द्या दुबळ्यांनो ! सोडुन ही विनाश-पाउल-वाट्
सौख्यासाठीं आओच्या रक्ताचे सांडा पाट् !
अन् तुमचाही मिरविल ती पुरेपूर अभिमान्
परि घातुक ही झोंप पुरे आओची तुम्हां आण् !!

मालेगांव, २६–५–३९.

## देवी जयश्री !

[शा. वि.–सुनीत

गंजी पेटवितां दुरून दिसली ज्वाला, मिळाला जय
आनंदाश्रु कितीक तों झरझरा नेत्रांमधीं दाटले
ती वाऱ्यावर डोलती बघुनियां माझी मराठी ध्वजा
ह्या अंतःकरणांत भाव-सरिता फोंफावली, धांवली !
आओीला वदलों 'किती लगबगा झाली प्रतिज्ञा पुरी'
अम्बेच्या चरणांवरी पहुडलों आल्हादुनी कैकदां
अन् घोड्यावर स्वार होउन झणीं ती दौड केली किती
हा आनन्द दिशादिशांत-भरला—झाला मराठा जयी !
आतां हाय ! परन्तु काय पडली कानांवरी बातमी
'तानाजी पडला' ! हिरा हरपला, माझा अिमानी सखा !
आओी ! सांगुं कशी तुला परि अतां ही दुःख-वार्ता पुन्हां ?
प्राणांचें बहुमोल घेउन कशी आली जयश्री घरा !
ये, ये नित्य अशीच ये मजकडे देवी जयश्री ! परी
येअूं मात्र नको पुन्हां हिरविण्या गे, अन्य कोणी सखा ! !

पुणें, १५–९–३७.

## कल्याणी-गीत—!

[चाल : प्रतीकूल होईल कैंचा०

शिवराया ! कानीं घुमती तुझे थोर बोल !
नभाहून तूं अुदार
सागराहून गभीर
वीणेहून हळुवार
तुझ्या तेजापुढें फिके सारे ग्रह-गोल !
करूनियां शिरजोरी
गाअीला ह्या दरबारीं
अुभी केली तुजसामोरी
परी वैरण तूं दिलें सांवरून तोल !
'माय माझी होती तर
होतों मीही चारु-तर
तुझें शब्द देती धीर
अुचंबळतें हृदय भावनेनें खोल !
डोळां येअि अश्रू-जळ
ओघळते घळघळ
गळां मोतियांची माळ
तुझ्या, गुम्फीत बसें मी अेकान्तीं अमोल !
माझ्या जीव वीणेंतुनी
तुझ्या शब्द-अंगुलींनीं

छेडिलीं रे गोड गाणीं !
तुझ्या बोल-फुलांनीं ही मोहरली वेल ! !

मालेगांव, १५-५-३५.

## बंदिवान् गरुड —!

[छन्द : जीवितधागे

आला हा मोकळा पहाट-वारा
अंगावर येई हाय ! शहारा !
पूर्वा ही प्रसन्न हांसे
भर्जरी शालूही नेसे
आतांच गातील सृष्टीचे भाट
आकाशीं उषेचा सोनेरी थाट !

उदास जाहली ही चन्दा-राणी
सांगे शशांकास आणि गाऱ्हाणीं
"ऐकून आपुलें गूज
अुडाली अुषेची नींज
नटली भेटाया रवि-रायास
निघाली जोडून घोडे रथास !"

लागली कोठून ह्यांना चाहूल ?
सारेच लागती गाया मंजुळ

सारिका, मैना, कोकिळ
भारद्वाज, शुक, चण्डोल
लागती गावया हे मुक्तछन्द
आकाशीं भराऱ्या घेती स्वच्छन्द !!

—अन् मीही घेतोंच आतां भरारी
हाय ! परी पायीं लंघर भारी
होतात पंख घायाळ
डांचती शृंखला-व्याळ !
काल झडपिलें व्याळ विषारी
आज हा पायांत लंघर भारी !

काल मीं घेतली स्वैर भरारी
आज सोनियाच्या हाय ! पंजरीं !
कालचें मनीं स्मरावें
सारखें आंत झुरावें
काल लाजविले ते रवि-कर
आज हा भिववी मज अंधार !

पिंजऱ्याचे गज मज हांसती
प्रचंड आपुली दाविती शक्ती !
वाटलें वांकवूं तोंच
हाय ! हो जाया ही चोंच !

झुंजून झुंजून झडले पंख
शृंखला-व्याळानें मारिला डंक !
जा ! जा ! पांखरांनो ! दूर आकाशीं
गाणीं अुल्हासानें गाया अुषेसी
अर्पाया अर्घ्य रवीस
कण्ठींचें ओता पीयूष !
माझें मी मूकच गाअीन गान
अूष्ण आसवांचें अर्घ्य अर्पून ! !

मालेगांव, २०–४–३८.

## सीता-गीत—!

[वृत्त : तूणुक

"कां अुगाच पातिव्रत्य मदिय आज शंकितां ?
ज्यास मी तनू-मनें
अर्पिलींत पूजनें
होअिल का चाळवून त्यास मी कलंकिता ?
मदिय जीव-नाथ राम
म्हणुन जीवनांत 'राम'
देअुनिया त्या विराम काय होउं शापिता ?
मन्मुखांत राम-नाम
बघा ! लोचनींहि राम

अन्तरांत राम अेक ! अन्य कोणि देखतां ?
घालितां कशास हात
सतिच्या पावित्र्याप्रत ?
कीं तुमच्या अन्तरिंची सुप्त न्याय-देवता ?
कैसें दावूं अिमान
छेदितही हलवि मान
ती सती सुलोचना—दावि पति-मुखीं स्मिता !
काय जी रामाप्रत
अर्पियली, ती स्पर्शित
अन्यांनीं; बोलतसां ?—चित्तिं पेटते चिता !
दावूं कैसें अिमान
वच तुमचें साहि न मन !
घेअिल मज भू अुदरीं जर मीहि पतिव्रता !
भूमाते ! दोअिं स्थान
तुजविण मज नान्य त्राण !
जीवाची तुजसि आण !" लोपली सती सीता ! !

मालेगांव, ३०–१०–३४.

## गोड पांवा वाजवीं—!

[वृत्त : पाण्डव

मौन कां स्वीकारिसी हें ? गोड पांवा वाजवीं !
बांसरीचा सूर तूझ्या, कोकिळेला लाजवी ! !
राधिका मी ही तृषार्ता, तूं कृपेचा तोयद
गान-सूराच्या सरी त्या वर्षूनीयां पाजवीं !
ज्या लकेरी काढिसी तूं बांसरी लावून ओठीं
त्यामधीं पीयूष वाहे ओठिंचें, रे, वाजवीं !
[मी तुझ्या ओठांस लावूं ओठ प्याया ती सुधा ?
छे, मुळीं वृत्ती अशी ना शीलवन्ता शोभवी !]
प्राणवायू तूं भरोनी वाजवीसी बांसरी]
अैकवीं ती श्वास माझा नीट राया ! चालवीं
हाय ! मीना मी जणूं पाण्याविना रे, तळ्मळें
त्या सुखाचे सागरीं मोदें मला तूं पोहवीं !
येअुं दे लाटांवरी लाटा नि मातें हर्षवीं
माझिया दोलीं ह्रदाच्या मन्मना आन्दोलवीं !
गान तूझें दे निनादूं माझिया ह्न्मन्दिरीं
जें करी नाजूक अैसी भावना जागी, नवी !
पाहसी कां अन्त वांया ? गांजल्याला रंजवीं
कां अुगा हें मौन राया !— गोड पांवा वाजवीं ! !

नाशिक, १९–८–३४.

## माझे कापुन पंख....

[सुनीत : शा. वि.

माझे कापुन पंख 'ऊड' वदती 'जा दूर नीलाम्बरीं'
भाले टोंचुन पाडिती कितिक हीं माझ्या क्षतें अंतरीं
जो घायाळ तयांसही दुखविणें ही नीच वृत्ती पुरी !
भ्याडांच्या इथल्या सदा कुटिलता ही बाणली अंतरीं
होतों मारित पंख, कापित हवा स्वच्छन्द उंचावर
नाहीं पाहवलें तयां—! मजवरी अन् सोडिलाही शर
सौख्याच्या सदनामधून मजला ओढूनियां माझिया
'जा, उंचावर दूर दूर !' सजती ही दाखवाया दया !

प्राणांशीं करण्यास खेळ धजते वृत्ती तयांची खुनी
पेरायास क्षतावरी लवणही सामर्थ्य वाणींतुनी
मन्त्रोच्चार करून उंच वदती "सर्वांस स्वातन्त्र्य तें"
अन्यातें परतन्त्र मात्र करणें कृत्यांतुनी चालतें !

देवा ! दैव-विलास काय दुबळा भालीं असा लेखिला ?
दे सामर्थ्य अदंड आज मजला दंडावया या खला !—

मालेगांव, २२-१०-३७.

## हिरवें पान —!

[जाति : वरदान

गेलें गळुनी पान हिरवें गेलें गळुनी पान्
वेलीवरती लव डोकवलें
रक्तरंग लेवुनी हांसलें
वाऱ्यासंगें जरा नाचलें
गुणगुणलें मधु गान—हिरवें०

कळ्या कोवळ्या तयास पाहुन
भुलल्या, झुलल्या, गेल्या मोहुन
सावलींत कीं त्याच्या राहुन
दिला तया बहुमान—हिरवें०

कितीक पानें वेलीवरती
पिकती, सडती परी न पडती
वृथाच सळसळुनी फडफडती
जरी न अंगीं त्राण—हिरवें०

हेंच परंतू बिन-पिकलेलें
वेलीवरुनी हाय ! गळालें
दंवासवांनीं क्षणांत भिजलें
उजाड गमतें रान—हिरवें०

गळलेल्या त्या पानावरचें
कौशल देठ-शिरा-रचनेचें

बघुनी माझें हृदयच नाचे
आणिक सुटतें भान्—हिरवें०

पुणें, २५–११–३६.

## मित्र-स्मृति —!

[जाति : प्रणयप्रभा

आठवूं किती मी अतां तुला ?
जीव हा आठवुन व्याकुळला!
तुझें हांसणें जणुं चांदणें
तुझें बोलणें-मंजुळ-गाणें
तुझें चालणें राजसवाणें
जाहलास भूषण स्वीय कुला !
मावळतीला सन्ध्या भारी
अुधळी रंग कसा सोनेरी
त्यांतलाच कीं चेतोहारी
केंसांस तुझ्या लाभला भला !
स्व-भाव-परिमल तुझा दरवळे
सेवुन त्यातें मानस हुरळे !
खुलत सुरंगीचेच जणुं कळे
हे रसिक-भृंग लोभले फुला !

आर्जव भरलें निळया लोचनीं
प्रभा पसरली प्रसन्न वदनीं
प्रेमळतेचा अंतःकरणीं
हा वाग-वगीचा किति फुलला !
वसन्तांत तूं जीवितांतल्या
प्रणय-बोल बोलसी बुल्बुला
ऐकुन जीव कसा हा झुलला
आवाज रुपेरी तुझा खुला !
—परी अवेळीं जासी येथुन
कितिकांना तूं चटका लावुन
निनाद मधु गीतांचे घुमवुन
स्वप्नसा हाय ! तूं क्षणिं विरला !
आठवूं किती मी अतां तुला ?

पुणें, २८–१–३७.

## दिवंगत कवीस—

[वृत्त : वसन्त

अतां येणार ना कानीं तुझीं तीं गोडशीं गाणीं !
मनाला धीर देणारी निमाली ती तुझी वाणी.
कुठोनी हास्य तें आतां मनाला वेड लावील ?

जगीं सर्वत्र ह्या कां रे सुवर्णाच्या कधीं खाणी ?
निघोनी त्या घडी गेल्या सुखाशेच्या, जिव्हाळ्याच्या,
अतां येईल सांगाया कुणी तीं गोड गाऱ्हाणीं ?

जगाच्या धूर्त बाजारीं पटेना कोठला सौदा
तया मोठेपणा ज्याच्या खिशामध्यें सदा नाणीं !
कधीं तूं काव्य-आकाशीं भराऱ्या मारिल्या मोदें,
परी पृष्ठीं धरेच्या ह्या असे मी चालता प्राणी !
जहाली दैव-योगानें तुझी माझी सख्या ! भेट,
दिली सौंदर्य-दृष्टी तूं बघाया स्फूर्तिचीं लेणीं !

कशाला त्या स्थलीं जाऊं जिथें कीं भेटलों तूं मी ?
कशाला लावुनि घेऊं दिव्यांची आंतल्या श्रेणी ?
वियोगानें तुझ्या येतो कसा दाटून हा ऊर !
फुटेना शब्द अन् सांठे कसें डोळ्यामधें पाणी ! !
तुझीं तीं पाउलें आतां घराला ह्या न वळणार,
अतां येणार ना कानीं तुझीं तीं गोडशीं गाणीं !

पुणें, ९–१२–३६.

# पंखांत जोर........!

[गज्जल

पंखांत जोर भरूनियां फिरतां निळ्या नव अंबरीं
तूं आणि मी पृथिवीवरी किति वर्षिल्या सुखदा सरी !
तूतें परन्तु लाडक्या ! कुठुनी जवें शर लागला
स्वर्गीय-गान-झरा तुझ्या मुखिंचा झणीं चिर थांबला !
फांदीवरी अेकाच कीं तूं आणि मी लव हांसलों
नेलें फुला ! खुडुनी तुला ! मी अन्तरीं बघ कष्टलों !
आतां कसें मग राजसा, तें नाचणें झुळुकेंसवें ?
आतां कसे मधु साज ते अंगावरी चढणें नवे ?
तूं ठेविल्या आलेखुनी त्वच्चित्तिच्या लव ज्या खुणा
डोळे भरोनी पाहतों मी कीं तयास पुन्हां पुन्हां !
हीं स्मारकें तव अल्पशीं, देती धृती मम ह्या जिवा
देवा ! विझो नच हा तरी कीं माझिया पथिंचा दिवा !
ते पंख आणिक चोंच ती, तो वर्ण अन् मधु गानही
जों लोपलीं चहुंबाजुंनीं तों पेटली मज ही मही ! !

पुणें, २५-११-३६.

## समाधीशेजारीं—!

[जाति : मुद्रिका

भेटलास मज तूं खिन्न जीवनीं सखा
जातसे किरण-तेजानें उजळुन न श्याम मेघ का ?
गाळिल्या किती मीं निशि-दिनिं अश्रू-सरी
निर्मिलें तयांमधुनीही ते अिन्द्र-चाप तूं परी !

मी इवला पक्षी, कसा चढूं अम्बरीं !
फिरविलेंस तों मजला तूं घेअुन निज-पंखावरी !
हें निळें निळें आकाश मोहवी मना
नेऊन अुंच मजला ह्या पंखास दिली चेतना !

परि आज समाधीमधीं शान्त झोंपसी
शान्तता तुझी ही जीवा बेचैन करी रे, कशी !
बाजूस झुळझुळे शान्त शान्त ओहळ
अकतां गीत तें त्याचें वाढते अुरीं तळमळ !

ही भयाण शान्ति अिथें पसरली जरी
येथेंच बसावें वाटे तुजजवळ नेहमीं तरी !
हे भरून येती डोळे अन् अन्तर
तुजवरी तरी धरणार मी सतत हृदय-पांखर !!

स्थापिल्या पादुका तुझ्या समाधीवरी
अभिषेक तयावर चाले ह्या सांडुन अश्रू-सरी

हे हळूहळू भंगून चालले चिरे
कवळुनी तयां धरितां मी जातील सांधुनी त्वरें !
आमरण आणुनी येथें वाहिन फुलें
न्हाणुनी चरण अश्रूंनीं, वन्दीन तुझीं पाउलें ! !

पुणें, ४–१०–३७.

## प्रीति-देवता— !

[वृत्त : सूर्यकान्त

हृदयाचें सिंहासन–त्यावर बसे प्रीतिदेवता
खडा पहारा तिच्याभोंवतीं भावांचा जागता
तिच्या स्वागतास्तव काव्यांची सुरेल नौबत झडे
अभिषेकास्तव तिच्या, अश्रुंची सदैव वृष्टी घडे !
वीर-वरांच्या तेजाची तद्-अंगा लागे अुटी
तिच्या कर्पुरार्तीस्तव ज्योती जीवांच्या पेटती !
तिला गौरवावया अुधळणें सत्त्व-गुणांचीं फुलें
तिचें रूप देखून दिव्य, मन भयादरें हें झुले !

तिला फेंकुं द्या अेक कटाक्षच, जाया होअिल तनू
कारण नेत्रीं तिच्या तीक्ष्णसे सज्ज बाण अन् धनू !
तिचा ओठ ओठास भिडूं द्या, वाढेलच तळमळ
जरी सांठली त्यांत सुधा तरि करील ती व्याकुळ !

पाय-घड्या हृदयाच्या पसरा दो—अेकच कीं—क्षण
वेडा होअिल जीव अैकुनी 'छुमछुम' ते पैंजण !
दुरून दिसते शीत-चन्द्र जणुं-परी किती दाहक
पवित्रतेमधिं लाजवील अन् पवित्र तो पावक !

अशी कोण जी गातां विश्वहि धरी ताल डोलता ?
प्रीति-देवता ! प्रीति-देवता ! अेक प्रीति-देवता ! !

मालेगांव, ३०-३-३५.

## शशिकले !—

[जाति : पद्मिनी

काय अशी लाजशी ? शशिकले, आम्हांमधिं ये कशी !
पुरे जाहले आढेवेढे
सुटलें आतां आम्हां कोडें
आवड ज्याची तेंच वावडें
अैसें कां दाविशी ? शशिकले, आम्हांमधिं ये कशी !
तुझ्या स्वागता अम्हि मैत्रिणी
पहा पातलों नटुनी थटुनी
गोड तुझ्यास्तव गातों गाणीं
काय न तूं अैकिशी ? शशिकले, आम्हांमधिं ये कशी !
तुला कशाला अमुचें गाणें

साधें-भोळें ग आवडणें ?
भारियलें जों तुजला त्यानें
त्याच्यांतच गुङ्गशी ! शशिकले, आम्हांमधिं ये कशी !
काय बोलसी "थट्टा असली
कसली करितां सदैव मेली !" ?
बघ आतां ही थट्टा सरली !
काय तरी लाजशी ? शशिकले, आम्हांमधिं ये कशी !
ये, तुजभंवतीं फेर धरोनी
ढाळूं चवऱ्या गातच गाणीं
[सतवुं नका ग तिजला कोणी
खोडि करुन गोडशी !] शशिकले, आम्हांमधिं ये कशी !
अशीच ये कीं लाजत लाजत
दिसेल आम्हांला मग गम्मत
[खालीं सागर थयथय नाचत
कळे न जादू कशी !] शशिकले, आम्हांमधिं ये कशी !
येतां तूं, तो नाचायाला
लागे, कैसें भारिशि त्याला ?
मिळविलीस ग कुठुन ही कला
प्रीतिची रम्यशी ? शशिकले, आम्हांमधिं ये कशी !

पुणें, १३–९–३५.

मराठी ग्रंथ संग्रहालय.
नं. ..........
ता. ....
ठाणे.



## अव्यक्त प्रेम—!

[वृत्त : पाण्डव

'पूजितों चित्तीं तुला' हें ना कळो केव्हां तुला
मी तुला गाओन अेकान्तीं स्वतःशीं अेकला !
घातली मीं साद येतां माझिया दृष्टींत तूं
अन्तरीं प्रत्युत्तराची ती न आकांक्षा मला !
ये अुधाणाची फुटोनी लाट अुंचावे जरी
तें कुठें आकाश अन् कोठें शशीची ती कला !
पेटली ज्योती तुझ्या गे ! दर्शनानें अन्तरीं
भोंवतींचा माझिया अन्धार सारा लोपला !
जा कुठेंही दीपके ! तूं कार्य तूझें संपलें
मार्ग पुष्पांतून तूझा जात, तूंतें तो खुला.
भृङ्ग होओी धुन्द सौगन्धें नि हिंडे सारखा
फूल तें शोधी म्हणोनी दोष द्यावा का फुला ?
दीप लावी जी तमीं अन् शोभवी ओसाडही
जागवी जी झोंपल्या चित्ता, न ती साधी कला !
प्रेम बोलूनी कशाला दाखवूं माझें तुला ?
मी तुला गाओन अेकान्तीं स्वतःशीं अेकला !

पुणें, २१–८–३७.

## चन्द्रा-राणी—!

[सुनीत : शा. वि.

बाजूला तम सारुनी हळुहळू आला वरी चंद्रमा
अन् घेतोच मनास वेधुन नभीं हा सान्द्रसा नीलिमा !
झालें शान्त चहूंकडे नि भरला वाऱ्यांत हा गारवा
ये कानांवर शब्द दूर करितो 'हूं हूं' कुठें पारवा !
रात्रीचें उघड्यावरी पसरलें सौंदर्य-भांडार हें
डोळ्यांनीं अवल्या कितीक हृदयीं वेंचून घेऊं सये ?
हा डौलांत सरू-तरू डुलतसे हा मागचा नीलिमा
शोभा काय तशांत हा अुगवता फेंकी वरी चन्द्रमा !
मीं सौधावर येअुनी बघितला हा सोहळा दिव्यसा
मातें मी विसरून, मी न कळलें रंगून गेलों कसा
झाला स्पर्श मनास, आणिक सखे, हेलावलें अंतर
मी जातों विसरून 'स्वत्व' पडतां दृष्टीस जें 'सुंदर' !
कां आश्चर्य तुला ? तुला बघुनियां झालों मनीं अुन्मन
मुग्धे ! तूजमधें अथाङ्ग भरलें सौंदर्य चंद्राहुन !—

पुणें, ९-१२-३८.

## ओढणी— !

[जाति : मोहिनी

गोड ओढ लागे तूझी माझिया मनाला
आणि गान-लहरी तव ह्या झुलविती जिवाला !

चंद्र-दर्शनानें भरती येत सागराला
मोर-पिसारा कीं फुलतो बघुन मेघ-माला
किरण तसा तव प्रीतीचा फुलवि ह्या फुलाला
फेंकुनी कटाक्षां मज तूं नजरबंद केला !
हृत्सतारतारेवर जणुं अंगुली फिरावी
तशी तुझी दृष्टी माझ्या मना ओढ लावी
आणि तुझ्या कौशल्याची खोलताच दावी
लावियला तूं जो ओठीं धुंद प्रीति-पेला !
नयन तुझे भरले नित्य प्रीतिच्या कलेनें
बोल तुझे ओथंबति अन् प्रीतिच्या सुधेनें
अेक-लयी कां ना व्हावें तें श्रवून गाणें
गुणगुणून जें तूं केव्हां भारिसी मनाला !
तुझ्या प्रीतिच्या दोल्यावर बसुन जीव डोले
रूप तुझें देखुन डोळां हृदयिं भाव खेळे
तूं मला म्हणोनी 'अपुला' हृदय ओढवीलें
विमल प्रीति अधिकच खुलवी तुझ्या चारुतेला !
तूं कोठें जाशी निघुनी सांगुनी मला ना
चाहुली तुझ्या तरि कळती माझिया श्रुतींना
चालतात आपोआप पाय त्याच स्थाना
आणि भेटायाची लागे ओढणी जिवाला !

मालेगांव, १७-४-३८.

## *स्वप्न-मालेंतून....! [जाति : दिण्डी

स्वप्नमालेंतुन येत मला जाग,
यामिनीचा जों सरत प्रथम भाग !
गार वारे हे वाहतात शान्त,
आणि तारेही चमकती नितान्त.
स्वप्नमालेंतुन येत मला जाग,
गोड लहरींनीं थरकतेंच अंग.
कसें ? नेणें; चालून ये परंतू,
तुझ्या खोलीशीं !—ओढि प्रीति-तन्तू !

गर्द रजनीच्या शान्त अंतरांत,
धांवरा हा वाराहि विरुनि जात;
लोप पावे अन् गन्ध चंपकांचा,
जणूं स्वप्नांतिल ओघ विचारांचा !
कोकिळेची ती आर्त 'कुऊऽ' वाणी,
जात अटवींच्या अंतरीं विरोनी.
तुझ्या तैसा मी अंतरीं विरेन,
मला प्रियतम तुजवांचुनी कुणी न !

अुचल मजला वर ह्या तृणामधून,
किती होईं मी श्रान्त व्याकळून.

* शेलीच्या 'Indian Serenade' वरून.

तुझी प्रीती वर्षून चुंबनांनीं
ओष्ठ-नयनांचा ताप घे हरोनी !
हाय ! सुमनें सुकलींत कपोलींचीं,
किती धडधड वाढेहि अंतरींची
धरीं हृदया ह्या घट्ट आंवळून,
तुझ्या हृदयीं त्या जाऊं दे फुटून ! !

मालेगांव, १६–१०–३६.

ग्रंथ संग्रहा
क्र. २५८. ११८
ता. १०।५८
शा. गो.

## सौन्दर्य-पूजा— !

[ सुनीत : शा. वि.

तूं शय्येवर झोंपसी मखमली निश्चिन्त मोदामधें
श्वासानें हलतात पातळ तुझ्या त्या नासिकेच्या कडा
हो खालीं-वर ऊर, भाल विलसे रेंखीव भ्रूभूषित
अन् ही नाजुकही कितीक जिवणी आकर्षुनी घे मन !
येवोनी मज जाग, पाहत वसें सौन्दर्य हें सारखें
जाते झोंप उडून, पाहुन तुझें झोंपेमधें हांसणें
स्वप्न-सृष्टिंत काय तूं तरळशी ? तूं पाहसी काय गे ?
—निद्रेनें जरि बंद केलिंत तुझीं दृष्टी-कवाडें अतां !
तूं शय्येवर झोंपशी नि बघतों डोळे भरूनीच मी
सारी सुन्दर संपदा हृदयिं ह्या ही ठेवितों वेंचुनी
असें हें बघणें, बघून हंसणें हें का कधीं चांगलें ?

येतां हा अ-विचार, मी अधळुनी त्याला क्षणीं लावितों !
तूं शय्येवर झोंपशी— करित मी सौन्दर्य-पूजा सखे !
होतों स्वप्न-जगीं विलीन भंवतीं तों दाटती तीं सुखें ! !

पुणें, २७–८–३८.

## साफल्य— !

[वृत्त : अभङ्ग

तुझीया सारखी लाभुनीयां सखी
जाहलों मी सुखी पुरेपूर !
मणि-काञ्चनाचा जमोनियां योग
येथें कचित् ग जगतांत.
अुषेमागें सूर्य युग-युगें धांवे
परी कुठें व्हावें मीलन तें ?
आणि ठायिं-ठायीं दिसे विसंवाद
वाटे तो विषाद अननुभूत !
दिसतात स्वप्नें जरी मनोहर
स्वप्नीं जें सुन्दर सत्यींही तें ?
पडलेलें परी मला गोड स्वप्न
सत्यीं अवतीर्ण जाहलें तें !
आनन्द आनन्द दिशांत भरला
अन्तरीं उरला आनंद हा !

तुझ्या श्वासामधिं मिळाला हा श्वास
मग कां निःश्वास सरणें न ?
जाहलें साफल्य आणि जीविताचें
शिखर कीर्तीचें गांठू चल !

मालेगांव, २६–५–३९.

## होऊन धुन्द.... ! [जाति : मञ्जरी

होऊन धुन्द तिज कितीकदां चुम्बिलें.
त्या सौन्दर्यानें झालों मी उन्मन !
ओठांवर, नयनांवरी, कपोलांवरी
केसांवर, जिवणीवरी, कपाळावरी
वर्षून चुम्बनें फुलवियलें मीं तिला
बोलली न शब्दहि विनयवती ती पण—
पण हळूंच म्हणते 'क्षमा करावी गडे !
—चोरून चुम्बिलें आपणांस काल मीं' ! !

मालेगांव, २१–२–३९.

## येथून पुढें चान्दणें—! [जाति : मुद्रिका

हातांत मिळाला हात तुझा मखमली
कंठांत माळ सुमनांची अन् कोमल तूं घातली
चोरून पाहिलें आणि जरा मजकडे
तों आंत आंत मज वाटे सांडले सुधेचे सडे !
बोलणें तुझें ये मंजुळ कानांवर
संगीत आंत अुमटोनी राहिलों न भानावर
ते बोल कशाचे ? वीणेची झङ्कृती !
अन् लकेरीच गाण्याच्या येथून पुढें जीवितीं ! !
शोभसी गडे, तूं अतां अुमलती कळी
अेकेक अुमलतांना मी पाहीन तुझी पाकळी !
अन्तरांत फुलले किती आणि ताटवे
लाभणें न का सौगन्धी येथून पुढें वैभवें ?
चन्द्राची फुलली तुझ्या मुखावर विभा
लोचनांमधूनहि सांडे गे, सुन्दर चंद्र-प्रभा !
हरितात ताप तव सुधा-मधुर भाषणें
पसरणें जीवनीं कां ना येथून पुढें चान्दणें ?—

पुणें, १३–१–३९.

## ज्योत्स्ना-गीत—!

[ वृत्त : मन्दारमाला

ज्योत्स्ना कशी दाटली रम्य आतां सखी ! जाउं तीमाजि हिंडावया
सांडे सुधा-धार झेलून अंगीं चकोरापरी लागुं सेवावया
वृत्ती भरारून ये मोहरूनी सखे ! रोमरंध्रीं भरे चान्दणें
जाजावला जीव हो शान्त आतां, गमे येथ कांहींच नाहीं उणें !
होती अमावास तों जीव त्याला भुतें नाचलीं कल्पिलेलीं मनीं
तारे न हे वाटले चेतवील्या चिता भीति-दायी नभःप्रांगणीं
भालूहि ते भीषणालाप काढून पाडीत होते घरें अंतरीं
आतां परी सृष्टिचें रूप न्यारें ! तुझ्यासारखी ती दिसे हांसरी ! !
चंदेर चोहींकडे फांकलें हें रुपेरी दिसे ही पहा निम्नगा
चंदेरि आकाश चंदेर तारे नि चंदेर हें रंगवीतें ढगा !
चंदेर तूं वस्त्र ल्यालीस अंगीं भरूनी मनीं राहिलें चांदणें
आतां इथें चन्द्र हे दोन येतांच अंधार सारा न कां लोपणें ?
'ज्योत्स्ना मला आवडे' बोलसी तूं परी शोभसी तूंच ज्योत्स्नेपरी
ओठीं तुझ्या ती तिच्यांतील सांठे सुधा—[ओत या आर्त ओठावरी !]
अंगीं तुझ्या दाटली कष्टहारी तिच्यांतील ती गोडशी शीतता
सांडे तुझ्या हावभावांतुनी अन् तिच्यांतील ती रम्य उन्मत्तता !
ज्योत्स्ना अशी रम्य, तूं आणखी तींत ! आणीक गे काय आतां हवें ?
देवासही लाभती केधवां काय स्वर्गामधींही अशीं वैभवें ?

गाई रसोदात्त तूं गीत आतां-सभोंतीं भरीं सूर ते किन्नरी !
स्वर्गांगना, यक्षही लोभुनी गान येतील तें ऐकण्या भूवरी !!—

पुणें, २१–११–३८.

## दोन संक्रमणें

[सुनीत : शा. वि.

१

आलें घेउन रौप्य-पात्रिं हलवा रात्रीं तुझ्या मी घरीं
भेटीचा परि कां, मला न कळलें स्वीकार केला न तूं ?
माझ्या तोंच बसून घाव हृदयीं घायाळ मी जाहलें
आल्या ओघळुनी सरींवर सरी नेत्रांतुनी अश्रूंच्या !
येवोनी खिडकीसमीप बसतां दृष्टी नभीं जाउनी
डोळ्याला हलव्यासमान दिसले तारे, परी त्यांतुनी
आला एक तुटून, आणि पडला तो दूर कोठेंतरी
तेजाची चढती कमान ढळुनी तो जाहला फत्तर !

पाहीं मी हलवा फिरून दिवसा त्या रौप्यपात्रांतला
कांटा त्यावरला झडून, चढला त्याच्यावरी काळिमा
आले नेत्र भरून पाहुन तया, उद्विग्न झालें मनीं
संतापून परी क्षणीं उधळिला, मी स्वैर चोहींकडे

—येतांना परि तूं पुढून सहसा दाणे सल्या ! झेलले—
हर्षाची असळून लाट शरिरीं रोमांचही दाटले ! !

२

'घ्या ना हा हलवा करांत, बघुनी सांगा कसा जाहला ?'
'दाणे काय टपोर ! आणि भुलवी डोळ्यांस ही शुभ्रता
तारे काय सखी, नभांतुन इथें वेंचून हे आणिले ?
सप्तर्षी, मृग, व्याध, शुक्रहि दिसे अन् केशरी मंगळ !
कांटा हा फुलला—तनूवर जणुं रोमांच हे दाटले
कीं आश्चर्य कशास हें समजणें ? हे तीळही लाजले
हस्तस्पर्श तुझा तयास घडतां गेलेत रोमांचुनी
मातीचेंहि करील काञ्चन अशी 'स्त्री'च्या करींची कला !'
'झाली का पुरती स्तुती न अजुनी ? कां लाजवीतां असे ?
कांहींही पुसणें अिथें पुरतसे, तों ओघ होअी सुरू
गेलें मीच परी कशी विसरुनी ! आहांत तुम्ही कवी
दाणा अेकहि चाखला न अजुनी तों गोडही बोलणें ?'
—'कां गे, हा असला परन्तु फुलला कांटा शरीरीं तुझ्या ?
ह्या गालावरल्या तिळांत किनअी न्यारीच गोडी वसे ! !—

पुणें, १४–१–३९.

## रसिका—!

[ जाति : माधवकरणी

'म्हणाच अेखादी नव कविता' आग्रह तूं धरिसी
आर्जवें तुझिया बोलींत
रुंजीनें तव पंकज अुमले, सुगन्ध तूं भरिसी
दरवळे तो या खोलींत !
असा कोण कीं कलावन्त जो अन्हेरी रसिका ?
हृत्कला दावी खोलोनी.
दिसतां श्यामल मेघ मयूरा स्फुरती त्या केका !
'म्हणा' हा शब्द येअि कानीं.
अेक अेक अैकून शब्द, तव डोलतसे मान
रंगुनी देसी तूं ताल
मुद्रेवर गांभीर्य पसरुनी, आर्द्र होति नयन
लाल हो कानांचीं पाळ !
विकार-लहरी अुसळत तुझिया हृदय-सागरांत
तयांचे तुषार कीं नयनीं ?
संपुन जातें गीत, तरी तूं अपुल्या नादांत
रंगसी रसिके ! भावांनीं,
अेकही न मग शब्द बोलसी, टाकित निःश्वास
निघोनी जासि समोरून

भेट न देसी जरी लोटले कितीकही दीस
पाहतों तुज मी हेरून !
काय तरी ही तऱ्हा! कशी ही रसज्ञता नुमजे
जात मी मुग्धच होऊन !
पुन्हां कधीं तूं म्हणतां 'कविता गा नव' नच समजे
दावुं कीं न दावुं गाऊन !!

मालेगांव, ५–६–३७.

## मानिनीस—! [जाति : संगम

ही पुरे तेढ मानिनी !
करूं चल झणीं हात-जुळवणी !!
प्रीतिचा कौल दाविला
दावून जरा मुख मला
कां ओढिशि गे, ओढणी ?........करूं चल०
नेत्रांतिल नाजुक छटा
केसांच्या भालीं बटा
लाविती मना ओढणी !........करूं चल०
गालांवर खुललें हंसें
तें प्रीति-गान मुग्धसें

घुमतसे अजुन या मनीं !........करूं चल०
दावुनी मार्ग रतिभर
लकलकून गे लवकर
कां बनसी सौदामिनी ?........करूं चल०
प्रीत ना क्षणाची अशी
हो सतत क्षयी बघ शशी
प्रणयार्थ नभःप्रांगणीं !........करूं चल०
प्रणयांत दंग ही धरा
तूं धरुन तेढ ही जरा
कां होसी हत-भागिनी ?........करूं चल०
तूं अेक वांछिसी मनीं
परि अन्यच हो कृतिंतुनी
कां बघसी रागेजुनी ?........करूं चल०
अनुरागच रागीं परी
अुमटतो गडे, मन-हरी
लावण्य होत शत-गुणी !........करूं चल०
ही तेढ धरिसि कां फुका ?
लपविसी 'सहज'भाव कां ?
बाजुला पटल सारुनी !........करूं चल०

मालेगांव, १-५-३४.

## मेनके—!

[सुनीत : शा. वि.

स्वर्गांतून परंतु तूं अुतरसी ह्या भङ्गवाया तपा
मीही मोहुन लोभलों तुजवरी स्वर्गांगने मेनके!
येतां रम्य वसन्त ये टवटवी जैं रूक्ष त्या पादपा
तैं सौन्दर्य तुझें पिअून शमती हे नेत्र माझे भुके!!
त्या डोळ्यांत तुझ्या अथाङ्ग भरली ती झिङ्गवी वारुणी
ओठांतील तुझ्या पुनः पुनरपी प्यावी सुधा वाटते
अन् गालांवरती गुलाब फुलले. घ्यावीं फुलें वेंचुनी
तूंतें देखुनि भङ्गलें तप तरी प्रीती अुरीं दाटते!
'अिन्द्राचें पद जिंकणेंच' मनिंची गेली मनीषा लया
कामानें शर फेंकुनी अुलट कीं हें जिंकिलें अन्तर
मोहाचें तव इन्द्रजाल विणिलें तूं मेनके! लीलया
मी धुंदींत नभामधीं विहरलों अदृश्य पंखांवर!
कां गे, चाळवुनी परन्तु निघुनी जाशी वरी अप्सरे—
—तेजो-भंग करून? केंवि जुळवूं हे भंगलेले हिरे?

पुणें, २०-६-२७.

## हाय! कोठें तुझा कण्ठ—!

[ छन्द : अभंग

यशो-दीप माझे पाहीं  अुजळती ठायीं-ठायीं!
परी तुझे नेत्र कुठें  बघावया आज त्यांतें?

ग्रंथ ... क्र. ... ता. ...

माझ्या कीर्तीची दिगन्त झडतसे ही नौबत
परी कोठें तुझे कान ऐकावया माझें गान ?
गौरवाचे गळां हार पडतात भराभर
परी असशी तूं कोठें आज झुंगायातें त्यांतें ?
जिंकियला हा संग्राम गाजवूनी पराक्रम
हाय ! आज कोठें परी स्वागता तूं अुभी दारीं ?

केली फुलांची ही शेज तरी ये न डोळां नीज
हळुवार तुझे हात कुठें मला सुखवीत ?
केली दीपांची आरास सुखवी न लोचनांस
तुझ्या नेत्रांतले तारे ! आतां कोठें दोन हिरे ?
अुटणीं नि अत्तरें हीं लावियलीं जरी देहीं
विटलें हें मन गन्धा आतां कोठें तूं सुगन्धा ?
वैभवाची पखरण अुजळीतें हें सदन
तगमग होअी भारी लक्षुमी तूं कोठें घरीं ?
आसवांचे ओघळती पहा ! डोळ्यांतून मोती
अेकसर गुंफतात हाय ! कोठें तुझा कण्ठ ?—

पुणें, २६–११–३७.

## अनुरागीं—!

[जाति : अवनी

अनुरागीं गोड गीत आळविलें बाले !
तालावर त्याच्या हें हृदय तदा डोले ! !
गात वसंतीं कोकिळ
'कुहु कुहु' शब्दें मंजुळ
गोड तुझें गीत तया लाजवून गेलें !
अलगुज, सनई, सतार
काढिति जरि मधुर सूर
गान-माधुरी तुझी न त्यांत परी, बाले !
झालें हिंदोल हृदय
जीव तयीं गीती-मय
डोले, तों 'दुर्गा'ऽदी राग फिके झाले !
गानीं त्या नुरुन भान
गेलों आपण रंगुन
नाकळतां आपणांस सूर ते निमाले !
गेलें संपून गान
हृदयाला हालवून !
किरण जणूं फुलवुनियां मुग्ध पुष्प-झेले ! !
तेंच कधीं गुणगुणतों
भग्न मना रंजवितों !

आणि रंगतां तयांत नयन होति ओले ! !
अनुरागीं गोड गीत आळविलें बाले !

पुणें, २०-१-३७.

## दोन पत्रिका—!

[सुनीत : शा. वि.

१

आली आज 'तुझा विवाह ठरला' ही सांगते पत्रिका
झालें धस्स अुरांत ! मित्र तुजला माझाच, लाभे सखा !
गे, तो प्रेमल अन् हुशार, हंसरा, त्यागी तसा देखणा
क्रीडा-शील, रसीकही युवक तो—नाहीं कुठेंही अुणा !
तूंही कोमल, हांसरी नि रसिका, चन्द्रापरी सौख्यद
गाशी तूं कविता रसाळ, श्रमल्या जीवास शान्तिप्रद
अन् हा संगम पाहुनींहि भरतें दाटेल कोणासही
होतो हर्ष न मोगऱ्यासह कुणा पाहून जाअी-जुअी ?

होती प्रीति अथाङ्ग मात्र जडली माझीहि तूझ्यावर
'हो'कारात्मक आणि काय नव्हतें तूंही दिलें अुत्तर ?
जाणें मी विसरून तो परि अतां संबंध सारा जुना
तूझें मंगल अिच्छितें घडिघडीं मच्चित्तिची भावना !

'होवो मंगल नित्य' मी म्हणतसें पाहून ही पत्रिका
शंका हाय ! मनीं परी अुमटतें—'होते क्षयी चन्द्रिका !'—

वसंत-वैभव

## २

आतां ही दुसरी जुनाट दिसते डोळ्यांपुढें पत्रिका
हीमध्यें अपुलें मला हृदय तूं गे दाविलें खोलुनी !
ह्या शब्दांत अथाङ्ग अर्थ भरला, ह्या खोलही भावना
हो गोडी न कमी जरीहि शतदा ही काढिली वाचुनी ·
सौगन्धें भरली म्हणून हिजला कित्येकदां हुंगिलें
आल्या तों उसळून उत्कट हृदीं भावोर्मि आल्हादक
केलें सिंचन अश्रुंचें हिजवरी आनन्दुनी कैकदां
हें मूकाक्षर बोललें मजसवें भाषेमधीं गूढशा !

मोत्यांचें नयनीं तुझ्या चमकलें पाणी गडे, सन्तत
हीं मोत्येंच परंतु गे प्रकटलीं ह्या अक्षरीं तूझिया
पाणी तें नयनांमधील बघुनी घायाळ झालों पुरा
हीं मोत्यें बघुनी सदा हृदय हें जाओ दिपोनी सखे !

नेत्रीं तेज भरून ठेवित जरी ती लोपली तारका
डोळ्यांनीं भरल्या फिरूनफिरुनी ही वाचितों पत्रिका ! —

मालेगांव, ६-११-३७.

# तुला वाटेलच 'धन्य'—!

[छन्द : ओवी

टाळाया कां पाहतेस आतां मी जों भेटें तूज
कथावया चित्त-गूज ?
दृष्टीला ह्या भिडवींशी कां न आतां दृष्टी तुझी ?
—प्रीतिरंग अुधळी जी !
पुरे झाल्या चाळवण्या दाखविणें मजलागीं !
नको करूं मज अभागी
अभागी का माझा भाव वाटतसे आज तुला
संदेह कां मनीं आला ?
'मळला तो माझा भाव चळलीही माझी मती
जडे दुसरींवरी प्रीती'
असें तुझ्या मना वाटे ? आणि पटे हृदयाला
खातर मीं दिली ज्याला ?
किती खुळे चंचले, तूं ! काय आला मनीं किन्तू
'प्रीति-चंद्रा ग्रासे केतू' ?
हृदय जें दिलें तुला कैशी हिरावेल दुसरी
अेका म्यानीं दो समशेरी ?
राहती का तेज आणि छाया कधीं अेके ठायीं ?
ठेवूं नको किंतू हृदयीं !
कोनीं-कोनीं हृदयींच्या तुझी प्रीति-प्रभा फांके

तुझ्या प्रीतिचेच ठोके !
टाक वक्षावरी मान
पहा ठोके पडताळून
गवसेल प्रीत-इमान !
फोड किंवा हृदय हें
तुला वाटेलच 'धन्य'
पाहुनी, ना मूर्ति अन्य ! !—

मालेगांव, २८–७–३४.

## *दैवी सूत्र—!

[जाति : माधवकरणी

खळखळ वाहत बघ ओहळ हे नद्यांप्रती मिळती
आणि ह्या नद्या सागरास
सतत स्रोत स्वर्गीय वायुचे विरोनियां जाती
माधुरी देत भावनांस !
कुणीहि न जगिं अेकाकी ह्या सकल वस्तुजात
बद्ध कीं सूत्रानें दैवी
कशास रुसवा ? द्वैत कशाला ? तुझ्या अंतरांत
कां न मीं विहरावें देवी !
बघ पर्वत हे अुंच चुंबिती नभास–स्वर्गास
खेळते लाटेशीं लाट
फुल-राणी जर अुमलुन देअि न सुगंध वाऱ्यास

---

* Shelley च्या 'Love's Philosophy' वरून.

घालिती भृंग कीं हृत्कमलीं ह्या रुञ्जी
स्वर घुमती चेतोहारी !
तव हास्य-लकेरी येती माझ्या कानीं
तव मूर्ति बिंबते अश्रू-पूरित नयनीं
तुजकडे पाहतों अन् मी वेड्यावाणी !
करितों कीं नाजुक चोरी !
सांठवून नेतों कानीं हास्य-लकेर
ह्या हृदयाकाशीं करितों तुज शशि-कोर
आठवतों तव मी डोळे काळे-भोर
अन् गातों तुज कान्तारीं !
कधिं बघत वाट परि सज्जामाजी बसशी !
कां बघुनि मजकडे विषण्णतेनें हंसशी ?
कां हंसतां हंसतां परि तूं अश्रू पुसशी ?
ते गेले दिन सुख-कारी !
मी जरा थबकतों येउन तुझिया दारीं !—

पुणें, ६–९–३६.

९१८

## निशा-गीत—!

[जाति : गोविंद

ये रे, ये धांवून चन्द्रा ! ये रे ये धांवून
चन्द्रा ! ये रे ये धांवून !
खडि भरलेला निळा शालु हा आलें मी नेसून
पहात बसलें वाट तुझी अन् कुञ्जाकुञ्जांतून !
चन्द्रा ! ये रे ये धांवून !
तुला बघाया चोरुन, बुरखा काळा हा घेऊन
तनुवर, आलें; शिणले डोळे तुजला परि शोधून !
चन्द्रा ! ये रे ये धांवून !
कला-वन्त तूं असशी ना ? मग धरिसि असें कां मौन ?
हृद्-वीणा मम छेडुनि गीतें घुमवीं देहांतून !
चन्द्रा ! ये रे ये धांवून ! !
तुझ्या करांनीं काया माझी टाकियली धवळून
कितीकदां तूं; समय मला ते आठवतात अजून !
चन्द्रा ! ये रे ये धांवून !
पहा चाललीं कुमुदें माझ्या गालांवरिल सुकून
मम हृदयाचे चन्द्रकान्त-मणि बसले ओघ सुकून !
चन्द्रा ! ये रे ये धांवून ! !
साद घालुनी तुजला आला आतां कंठ सुकून

श्रमली काया, दमलें राया ! गेले नेत्र थकून
चन्द्रा ! ये रे ये धांवून !
ये ये लवकर—यायचेंच तर—वाऱ्यापरि धांवून
ना तर पुरता घात !—प्रभाकर येतो रे, मागून !
चन्द्रा ! ये रे, ये धांवून ! !

पुणें, १६–७–३५.

## संपादणी— !

[वृत्त : पाण्डव दिंडकी

चालवीसी ही कशाला आजला मायाविनी, साखरेची पेरणी ?
व्यर्थ आतां ती तुझ्या हास्यांतली कीं मोहिनी ही वृथा संपादणी !
शांतता भंगून माझी, भग्न व्हावें अंतर ही तुझी अिच्छा जर
तूं नको बोलूंच आतां तीं तहाचीं बोलणीं ही वृथा संपादणी !
हृत्प्रदेशीं माझिया सत्ता तुझी तूं अेकदां गाजविली सौख्यदा
होअुनी सामन्त तेव्हां अर्पिली मीं खण्डणी ही वृथा संपादणी !
मी पुरा जाणून आहें कीं असे स्त्री चंचल ! हालतां जैं अञ्चल
लोभणें ना आर्जवी आतां तुझ्या मी भाषणीं वृथा ही संपादणी !
अन् ‘मन जिंकील स्त्रीच्या’ घातकी हीही स्पृहा विस्तवाशीं खेळ हा
वंचना होतां, न लागे पापणीला पापणी ! ही वृथा संपादणी !

भेट प्रेमाची मला तूं अर्पिलेली राजसे, —तूजला सांगूं कसें ?—
कोन्दणींचा भंगुनी गेलाच आतां तो मणी ही वृथा संपादणी !
जा, नको टाकूं मला ह्या मोह-पाशीं तूं पुन्हां दावुनी आभास ह्या
आणि मीही ना फुलें ठेवीन केव्हां अैरणीं ! ही वृथा संपादणी !!

मालेगांव, २३-१०-३६,

## निवेल प्रीती कशी—?

[जाति : कोकिळा

निवेल प्रीती कशीऽ ? सखया ! निवेल प्रीती कशी ?
झालें जरि मी पर-दारा तरि प्रीति जशीच्या तशी !
तुला पाहतां हृदयीं भरली
नेत्रांमध्यें ह्या ओसंडलि
गालांवरती गोड हांसली
प्रीती जी, तिज बाह्य बंधनें करितिल कशि नाहिंशी ?
जरी जाहलों दूर तूं नि मी
फुलवुनि हृदयीं प्रीतिची धुमी
जरि विरहें ह्या तेज हो कमी
मारं तूंच एकदांच फुंकर ! फुलेल ती पूर्विंशी !
तुज वाटे, मी झालें पारखि
बुडवुनि तुजला प्रीती-चषकीं

तुझा विरह परि करितो तलखी
सोसुं कसा ? राजसा ! अश्रु हे म्हणुनी भिजविति उशी ! !
तुज वाटे, मीं लोटुनि दिधलें
भग्नहृदय अन् तुजला केलें
एकलिनें सौख्या अनुभविलें
मुळिं न चांदणें मजभंवतीं रे ! मी तर काळ्या निशीं !
रवी तळपतां ढळून वरती
नयनां नच ते तारे दिसती
किती परंतु झळाळताती
जणुं माझे हे भाव सन्निधीं तुझिया—तूं तर शशी ! !
प्रणयिनीच मी परंतु अबला
[हाय ! वाढतें पंकीं कमला !]
जीव-सखा तूं मज न लाभला !
तातांनीं मज तांत लावुनी पुरें पाडिलें फशीं ! !
ही तर देहांची ताटातुट
हृदयांचें आलिंगन बळकट
कांचन-मृगिंची गोड सजावट
दावुनि, जग हें अुगाच बघतें करण्या हृदया खुशी !
बाण कधीं सुटलेला परते ?

किंवा अुल्का नभांत चढते ?
कसें तुला विपरीत वाटतें ?
प्रीति निमालि न माझी, सखया ! निवेल प्रीती कशी ?

माळेगांव, १५–९–३४.

## जाअीच्या कळ्या— !

[जाति : स्वर्गङ्गा

वाट चालुनी शिणली काया—परन्तु आलों तुझ्या घरा
स्वागतास दारांत अुभी तूं आणि भेटल्या मग नजरा !
सुधा तुझ्या नयनांत सांठली तिच्यांत मी न्हाअून निघें
आणि पुन्हां भेटतांच नजरा लोचनांत ह्या अश्रु उभे !
ओळख अुजळुन खुणविलेंस मज कीं या मजमागोमाग
आणि अंतरीं दरवळली ह्या चांफ्याची हिरवी बाग !
चालुं लागलों तुजसंगें मी टाकिलेंस भारून मला
भेटीसाठीं तुझिया होता जीव किती हा तगमगला !
तुळशीचें वृन्दावन—तेथें थांबलीस जाअून जरा
फुललेला बाजूस बघितला ताफा जाअीचा हंसरा !
अर्धस्फुट त्यांतल्या कळ्या दों टाकिल्यास ओंजळीमधें
हंसतां हंसतां परी हुंदका फुटला दोघांनाहि सुधें !
बोल बोललों मुके, लाविला आणिक देवाला हात

'पवित्र प्रेमाचे हे धागे जन तोडाया बघतात !'
हळूहळू सरकून चन्द्रमा विझूं लागले ते तारे
आणि घेतला निरोप, सुटतां पहाटचे शीतल वारे !

हाय ! मधुर ही रात्र संपली; अुजळूं ह्या लागल्या दिशा
—येअिल आतां अुषा परी मजपुढें पसरली घोर निशा !

पुणें, १६–२–३८.

## शीर्ण फुलांमधीं.... !

[सुनीत : शा. वि.

"येथें ठेवियलीं कशास जपुनी हीं वाळलेलीं फुलें ?
चांदीच्या फुलदाणिमाजि रचिलीं– कौशल्य हें रे वृथा !
कां कीं ह्यांत नुरे सुगंध, मधुही, षट्पाद ज्यानें झुले
अन् केव्हांच तयांमधील सरली चेतोहरी चारुता !
झालीं शीर्ण फुलें. कशास इतुकीं सांभाळणें तीं अतां ?
रात्रंदीन तया स्वकीय हृदयीं कुर्वाळणें झेलणें ?
प्रेताला चढवून साज कधिही लाभेल जीवंतता
गेले भंगुन जे हिरे, खुलविती केव्हां तया कोंदणें ?"
"गेला संपुन यांतला मधु, नसे मातें तयाची क्षिती
गेली सुंदरता लया, न डहुळे शोकें तरी अंतर !

जातांना सुमनें दिलीं मज तिनें हीं स्नेह-भावें किती
गेलीं वाळुन तीं, तरी मज रुचे ही घालणें पांखर
जीं हीं शीर्ण फुलें त्वदीय नयनां प्रेतापरी वाटती
—त्या ह्या शीर्ण फुलांमधीं मज दिसे मूर्ती तिची सुंदर ! !"

पुणें, १८–१२–३५.

## मी तुला गाणार—!

[गज्जल : तुंगभद्रा

जा कुठेंही तूं, परन्तू तूजला
भाव माझ्या अन्तरींचा अर्पिला !
तूं जरी पर्वा न माझी ठेविली
आवडे पूजा तरी तूझी मला
प्रीतिचे धागे जरी तूं तोडिले
भाव मी सोडीन ना माझा भला !
पंकजेला भृंग रुञ्जी घालितो
दे मरन्दा ती तरी ना त्याजला
आणि सूर्याच्या करांशीं हांसते
भाव भृंगानें तरी का टाकिला ?
अन् पतंगा दीप-ज्योती जाळिते
तो तरी का तीहुनी दूरावला ?

तूं जरी पर्वा न माझी ठेविली
हो तरी मद्भाव हा दूणावला !
प्रीतिचीं पुष्पें तूं जरी चुर्गाळिलीं
गन्ध येणें थांबणें का त्यांतला ?
—आणि केलें तूं मला जें वावडें
त्यामधेंही लाभणें गोडी मला !
देवते ! तूं हें न किंवा जाणशी ?
'त्याग होओ मान्य दैवी प्रीतिला' :
—मी तुला गाणार प्रेमें सर्वदा
तूं जरी धिक्कारिलें नेमें मला !

नाशिक, ९-८-२४.

## अभागिनी— !

[जाति : केशवकरणी

दुर्दैवानें कसा कपाळीं हाय ! घाव घातला
हात का देणार न आपुला !
प्रीतिलतेवर अश्रूंचें ह्या कितीक जळ शिंपिलें
मुळीं तिज कुणीं परी छेदिलें !
विसांवाच ह्या जीवाचा तो तुटला आधारही
पेटली सारी तों ही मही !

ह्या फुलासारख्या कोमल हृदयावरी
रसरशित निखारे काळ हाय ! आंथरी
वर्षणार नच का आपण त्यावर सरी ?
भूल देउनी दैवानें हा गळा हाय ! कापला
हात का देणार न आपुला ?
सवेंच केला जीवीताचा प्रवास आम्हीं जरा
हरपला तोंच हाय ! मोहरा
वाळवंट वैराण, वाटलें नन्दन-वन त्यांसवें
वाटलीं मोत्यांसम आंसवें !
प्रवास अमुचा जाहलाच कीं अर्धाही नच पुरा
हरपला तोंच हाय ! मोहरा
अन् आलें भालीं अेकाकी चालणें
तळमळत रात्र ही भकास कीं कण्ठणें
करितसें दाह हें कसें हाय ! चान्दणें
अभागिनीवर कनवाळू हा देव कसा कोपला !
हात का देणार न आपुला ?
जीवितांतला वसन्त फुलला सुन्दर चेतोहर
झडला अजून नच मोहर
साद घालुनी अजून घुमवी राअी कोकिळा
हिचा तर अजून मंजुळ गळा !

वाऱ्याच्या वाहती सुगन्धी झुळुकाही शीतल
येत परि ग्रीष्माची चाहुल
फुलवाल न का ही मलूल झाली कळी ?
जुळवाल न का ही तुटलेली सांखळी ?
अुजळाल न कां ही अुदास मेघावली ?
दीप दाखवा, पुढल्या मार्गीं तिमिर हाय दाटला !
—हात का देणार न आपुला ?

पुणें, ५–२–३७.

## दूरचा दिवा !—

[जाति : मुद्रिका

मार्ग हा आक्रमीं असाच थोडा जिवा
फेंकतो झोत आशेचे तुजकडे दूरचा दिवा !
कोठून अतां तो चन्द्र ? मेघ दाटले
तेजाळ पुञ्ज तारांचे ह्या ढगा-आड लोपले !
चमकते क्षणभरी मधून विद्युल्लता
दाखवी, तमिस्रा कैशी ही व्यापी साऱ्या पथा ! !

पसरलें पुढें हें किती दाट जंगल
परि किरण दिव्याचे येती हे झाडींतुन मंगल !
हा प्रवास अेकाकीच करावा किती ?
दूरचा दिवा हा आतां वाटतो जीव-सोबती !

लावुनी जिवाला सुखकर अपुला लळा
सोडून मित्र ते गेले तों माळ जाहला मळा !

त्या कशास आतां स्मरणें पूर्व-कृती ?
जें झालें मेलें गेलें का पुन्हां तयाची स्मृती ?
ह्या दीप-प्रकाशें पतंग केलें मला
तों किरणीं होउन स्वार कापणें मार्ग आजला !
मार्ग हा आक्रमीं असाच थोडा जिवा !
अुजळील भविष्य तुझें हा स्नेहाळ दूरचा दिवा.
—मज नको अतां तें— अुषा, अरुण, मित्र वा
हा सतत मात्र तेवावा स्नेहाळ दूरचा दिवा ! !

पुणें, ११–२–३७.

... ग्रंथ ...
क्रमांक नं. ११६
ता. १७।५५
ठाणें.

## सखी— !

[जाति : संगम

स्थापील मला अन्तरीं
सखी ती असेल कोठेंतरी !
मी हंसतां हांसेल ती
मी गातां गाअील ती
मी झुरतां स्फुन्देल ती
मला अनुसरील छायेपरी !.... सखी ती०

संग्राम घोर झुंझतां
अपजयी मला पाहतां
होईल स्फूर्ति-देवता
जयःश्री आणायातें घरीं !.... सखी ती०
जों तुफान-वारा सुटे
लाटेवर लाटहि अुठे
तारील तारु अेकटें
चमकुनी सदैव तारेपरी !.... सखी ती०
पाहुन तीं मोह-स्थळें
पाअूल वांकडें वळे
तों आणिल ओढुन बळें
मला जी झणीं सु-मार्गावरी !.... सखी ती०
लाभतां मला वैभवें
दाटतां सुखांचे थवे
गाअुनी गीत नव-नवें
सदा जी हंसेल पुष्पापरी !.... सखी ती०
ह्या हृदयींच्या भावना
ह्या वृत्तींतिल चेतना
ह्या मनांतल्या कामना
फुलवुनी, आणिल दिव भूवरी !.... सखी ती०

हें तिजला मन बाहतें
हें ह्रदय तिला शोधतें
तिज चित्तहि हांकारितें
कसें हें आतां वेड्यापरी !.... सखी ती०

मालेगांव, ५–११–३७.

## भाग्य-देवता—! [वृत्त : तूणक

पातलीस भाग्य-देवताच माझिया घरीं
आणि मींहि स्थापिलें तुला मदीय अन्तरीं !
भाव गोड लोचनीं
हास्य मुग्ध आननीं
चन्द्रिका झरेच लोचनांमधून ही भुरी !
तूं सु-वर्ण केतकी
लाभलीस मज सखी
देह-गन्ध करित धुन्द—वाटतेस कस्तुरी !
भाल तें तुझें विशाल
शोभवीत धर्म-जाल
बांधलीच कीं बिन्दी ही वरी कुणींतरी !
मृदुल मुक्त केश-पाश

गुन्तवीत ह्या मनास
मन्द मन्द चाल तुझी अन्तरास ह्या हरी !
ह्या चढून अुम्बरा
पातलीस जों घरा
पाअुलीं तुझ्या बसून येअि लक्ष्मी हांसरी !
मेघ श्याम अम्बरीं
खुलुन जात रवि-करीं
तेविं जाहलों प्रसन्न मीहि देवते ! अुरीं
पातलीस भाग्य-देवताच माझिया घरीं !

पुणें, ८-९-३७.

## ✓ निरोप घेतांना— !

[जाति : केशवकरणी

जातां ह्या अुंबरा घराचा आतां ओलांडुनी
दाटती अश्रू ह्या लोचनीं !
अडखळती पाअुलें घराच्या बाहेरी जावया
वांछितें मागें मन यावया !
ठेवियलेले आंत दाबुनी येथवरी हुंदके
लागती फुटायास सारखे !
लागलें हृदयही आतां हें धडधडूं

विंधिलें पाखरूं जसें पंख पाखडूं
लागुनी, अंबरीं अनन्त बघतें अुडूं !
ओढी कोणीतरी आंतुनी मला प्रीतिरज्जुंनीं
दाटती अश्रू ह्या लोचनीं !
वाट पाहती अुभे राहुनी तिकडे बाहेर 'ते'
अिकडे 'आअी' ही थांबते !
अिकडे आअी सरोवरापरि, तिकडे 'ते' चंद्रमा
ह्यांचिया मधें जणूं मी कमा !
वात्सल्याचा प्रीतिरसाचा किती गोड संगम
अंतरीं पडे म्हणुनि संभ्रम !
गहिंवरल्या हृदयीं निरोप घेअूं कसा ?
महिंवरल्या शरिरीं निरोप देअूं कसा ?
दहिंवरल्या नेत्रीं निरोप पाहूं कसा ?
"आअी, आअी ! शांतव मजला कुशीमधीं घेअुनी
दाटती अश्रू ह्या लोचनीं !"
आअीनें तों कन्या-कलिका हातावर झेलिली
घट्ट अन् हृदयीं आलिंगिली !
फिरवुनि पाठीवरी हात, तिज मस्तकांत हुंगिली
कापोलीं कितीकदां चुंबिली !

तिच्या नयनिंचे पुसुनी अश्रू, नयनीं तिज देखिली
विनोदीं हंसावया लागली !
अुमलली तोंच ती मद्गुल कलिका जरा
जावया निघाली पति-रायाच्या घरा
अुतरलीहि खालीं ओलांडुनि अुंबरा !
जातां ती अुंबरा घराचा आतां ओलांडुनी
आअिच्या अश्रू त्या लोचनीं !!

पुणें, ११-७-३५.

## देव-दूत—!

[जाति : दिंडी

सखी खोलीमधिं बाजुच्याच स्फुंदे
जरी घरभर ही शान्तताच नांदे
प्रसूतीच्या त्या अ-सह्य वेदनांत
तिच्या प्राणांशीं खेळ चाललेत !
सदा सौख्याचा दावि पावसाळा
दुःख-डोंबामधिं वर्षिते जिव्हाळा
संकटें जीं हांसून सोसणारी
अुभी आतां ती मृत्युच्याच दारीं !

कसे डहुळे ह्या हाय ! अंतरांत
आणि येति हे अश्रु लोचनांत

कसा पोटीं ये दाटुनी अुमाळा
केविं विझवूं ह्या अुफळल्यात ज्वाळा ?
येरझारुन येथेंच तगमगावें
आणि बाजूचे हुंदके श्रवावे
पुन्हां व्हावें घायाळ किती स्वान्तीं
प्रीति-वस्त्राच्या कांचतात तांती !

स्मृती सौख्याच्या लोचनांपुढून
कशा झरझर जातात त्या निघून
भाषणें तीं हळुवार आठवून
येति डोळे हे सारखे भरून !
–तोंच ताअी येअून वदे दारीं
"पुरे चिंता रे, भाति सरे सारी
टाक पेढ्याचा घांस ह्या मुखांत
घरा आला कीं, आज देवदूत"
घुमत सनया बाहेर अन् मनांत
घरा आला कीं आज देव-दूत !

पुणें, २१–९–३६.

## अुषा-गीत—!

[जाति : आशीर्वाद

बाळांनो, तारकांनो! घ्या निद्रा शान्त शान्त!
रजनी ती तुमची माता
तुम्हांला सोडुन जातां
तुमची मी मावशी तों तुम्हांला गीत गात!
पाळणा पहा तेजाचा
बनविला तुम्हास्तव साचा
अंगाअी-गीत गातें झोके हे मंद देत!
असतांना रजनी-माअी
शोभलांत ठायीं-ठायीं
मिचकावुन डोळे तेव्हां मधुर किती हांसलांत!
येतां मी तुमच्या दारीं
मावळली काय हुशारी?
लोपे का दिव्य कांति तुमची ती जन्म-जात
मी झालें अजुनी न आई
घेण्यास तुम्हां तों येअी
अंतरांत वात्सल्याच्या अुर्मी ह्या दाटतात!
घेण्यास तुम्हांला यावें
परि तुम्हीं दूर सरावें

दंवबिन्दू—अश्रू छे, हे— नयनीं ह्या लोटतात !
येअुं नका माझ्याजवळी
दुखविणें तुम्हां मीं न मुळीं !
बाळांनो, तारकांनो ! घ्या निद्रा शान्त शान्त !
जों गाढ तुम्ही झोंपाल
जाग तों जगा येअील
जा, निजा ! अतां हा आला तेजाचा दिव्य झोत ! !

पुणें, १५–७–३५.

## स्वप्न-संगीत—! [ जाति : मनमोहन

हा कोण मुशाफिर छेडित येअी हें मोहन-संगीत् ?
शान्त ती गम्भीर मुद्रा
लाजवी तें भाल चन्द्रा
आर्द्रता दाटली पुरेपूर कीं त्या प्रेमळ दृष्टींत् !
त्या गजानें तार छेडी
बोल किती हळुवार काढी !
ह्या स्वप्न-सुरांनीं जीव तरंगे हा मोहक गुंगींत् !
जीव जाअी व्याकळोनी
ह्या निराशेच्या झळींनीं

तों हिन्दोळ्यावर गोड सुरांच्या हा हृदया झुलवीत् !
प्रेम-भंगें चित्त पेटे
अन् पुढें अन्धार दाटे
तों जीव निघे हा न्हाउन ह्याच्या मधु सौख्यद वृष्टींत् !
मोगरी, जाओी नि चांफा
रातराणीचाहि ताफा
काय ह्या फुलांचा, संगीतांतुन पराग ये अुधळीत् ?
नाहलीं जी यौवनानें
फेकतां परि बाण मदनें
काय ही भंगलेलीच सांडते नव-बालेची प्रीत् ?
छेड रे, अैशींच गीतें
शान्तता लाभे जिवातें
ह्या रडल्या-कढल्या हृदया वाटे हें अंगाओी-गीत् !
भारुनीयां ह्या जिवासी
येथुनी कां दूर जाशी ?
सुखवुनी जरासा जाशि निघोनी हृदयाला दुखवीत् !

× × ×

हें सुखाचें स्वप्न विरलें
लोचनीं अश्रूहि जमले
वाटतें रमावें पुन्हां पुन्हां त्या परन्तु सारंगींत् ! !

पुणें, २८–१–३८.

## कलावन्त—!

[जाति : दिंडी

—असा चाले क्रम मूर्ति घडविण्याचा
दिवसरात्रींतुन छंद तोच त्याचा
आणि मोहक आकार तिला आला
स्वप्न-पूर्तीचा त्यास हर्ष झाला !
तिच्यासाठीं दिस-रातभर झिजावें
तिच्यासाठीं विसरून स्वत्व जावें
कष्ट केले विश्रान्तिविना ऐसे
काम होतें परि राहिलें जरासें !

मूर्ति घडलेली नग्न रतीची ती
बघुन सुन्दरतेचीच ये प्रतीती
किती किमया टांकीत सांठलेली
मूर्त दगडांतुन देवता अुदेली
भाव वदनावर रम्य रेखिलेले
बघुन निमिषामधिं रसिक लुब्ध झाले !
कोरियेलीं रेखीव किती गात्रें
भारिते कीं ती चित्त मूकमंत्रें
दिवस थंडीचे, रात्र 'किर्र' बोले
चहूंबाजूला शान्त शान्त झालें

परी थंडीनें कहर माजवून
घोंस द्राक्षांचे टाकिले चुरून !
पांखरांचा तर लोपला अुबारा
क्षणीं शोधाया लागलीं निवारा
परी गेलीं थंडींत कांकडून
हींव जाअीना पंख पांखडून !

मूर्तिशेजारीं पांघरून शाल
पडुन होता तो राहिला खुशाल
परी डोळ्याला लागला न डोळा
प्राण होअूं लागून आंत गोळा !
आणि मूर्ति ती बघुन वस्त्र-हीन
क्षणीं आलें त्या आंत भडभडून
वाटलें, ही जाअील कांकडोनी
शाल तिजवर ती घातली म्हणोनी !

समाधानाचा सोडियला श्वास
आणि तसल्या तो हांसला हिमास
झोंप आली मग त्यास सुखें तेव्हां
—परी नाहीं अुठलाच पुन्हां केव्हां ! !

पुणें, २४–१–३९.

## कोणीतरी— !

[वृत्त : अभङ्ग

समोर डोंगर कायेचा कठोर
खेळवी निर्झर कोणी तरी !

ग्रीष्म ऋतूंतील रखरखे ऊन
वृक्षां दे जीवन कोणी तरी !

झाडांवर कळ्या असूनीयां बन्द
ओतितें सुगन्ध कोणी तरी !

नभाच्या मण्डपीं टांगतें झुम्बर
साऱ्या रात्रभर कोणीतरी !

प्रभातीं फेंकून मूठ गुलालाची
अुजळितें प्राची कोणीतरी !

निर्मियेलें 'स्त्री' हें काव्य जातिवन्त
कला मूर्तिमन्त कोणीतरी !

राहून अदृश्य विश्वाचा संसार
चालवितें थोर कोणीतरी !

कुणीही तें असो ! लवतसे मान
कराया वन्दन तयालागीं !

नाशिक, १३-२-३५.

## शोधूं कुठें तूज— ?

[वृत्त : अभङ्ग

शोधूं कुठें तूज ? पुष्पांत सुगंध
तुझा देह-गंध दरवळे

शोधूं कुठें तूज ? खळाळे ओहळ
गायन मंजूळ तूझें चाले

शोधूं कुठें तूज ? आकाश-गंगा ही
मन माझें मोही हास्य तूझें

शोधूं कुठें तूज ? चंद्रिकेची वृष्टी
तुझी स्निग्ध दृष्टी सौख्यद कीं

शोधूं कुठें तूज ? नभ तारायुक्त
डोईचा मुकूट तुझ्या, वाटे !

शोधूं कुठें तूज ? सागर गंभीर
तुझेंच अंतर अथाङ्गसे

शोधूं कुठें तूज ? मन्मन हो पिसें
कोठेंही न दिसे मूर्ती तूझी

तोंच कुणी वदे 'खुळ्या ! कां ही खंत ?
तुझ्या हृदयांत शोध मला' !

नाशिक, ५-२-३५.

## कधींतरी— !

[छन्द : अभङ्ग

जाणें, नयनांचें फिटेल पारणें
तुझ्या आगमनें कधींतरी !
कलिका आलेली झाडावर मुग्ध
वितरेल गन्ध कधींतरी !
अस्ताला गेलेली आज चंद्र-कोर
भरील अंबर कधींतरी !
जाअूं दे ! कोकिळा गेलीसे निघून
गाअील फिरून कधींतरी !
चक्रवाका ! अुषा सरून रजनी
येअील गगनीं कधींतरी !
आणि आटलेली राजापुरी-गंगा
प्रकटेल चांगा कधींतरी !
परी विरहाच्या यातना दारुण
नेणार हरून कधीं तरी ?
सोसवेना ताण आतां, याच क्षणीं
आण तुझा झणीं "कधींतरी" !

नाशिक, १७–१–३५.

## आतां कां उशीर ?—

[छन्द : अभङ्ग

आतां कां अुशीर  येअीं रे सत्वर
तुझ्याच खातर  मत्सर्वस्व !

आतां कां अुशीर ? पंकज मी जर
तर होअी कर  खुलवाया !

आतां कां अुशीर ? होत मी बांसरी
अधरीं तूं धरीं  वाजवीं रे !

आतां कां अुशीर ? मेघ अस्ताचलीं
रंगव तूं भली  माझी कडा !

आतां कां अुशीर ? अून-वर्षा जणुं
होत, इन्द्र-धनु  प्रकट तूं !

आतां कां अुशीर ? होत मी रजनी
चमक चांदणी  मंदशी तूं

आतां कां अुशीर ? धांव कां न घेशी
ढोंग कीं मानिशी भक्ती माझी ?

तर तूंच सांग  काय मी रे, होअूं
काय होतां शिअूं ! येशील तूं ?—

नासिक, १७–२–३५.

# अुघड कवाडें— !

[छन्द : अभङ्ग]

अुघड कवाडें, निबिड अंधारीं
आलों तुझ्या दारीं अनाथसा !

अुघड कवाडें, मेघ गडगडे
चित्त धडधडे गर्जनेनें !

अुघड कवाडें, वीज लकलके
किती मी दचकें ह्या तेजानें !

अुघड कवाडें, पर्जन्याच्या सरी
शहारे शरीरीं आणतात.

अुघड कवाडें, अुठे झंझावात
घडे वृक्ष-पात कडाडून !

अुघड कवाडें, सारेंच भीषण
भूतसे पाषाण भिवविती !

अुघड कवाडें, किती स-विश्वास
तुझिया दारास पातलों मी !

अुघड कवाडें, नाहीं अुघडीत ?
बरा जीवनान्त जिण्याहून !!—

नाशिक, १५-२-३५.

## प्रतिभे ! घे बेफाम भरारी— ! [जाति : तुतारी

१

प्रतिभे ! घे बेफाम भरारी
अफाट तुज आकाश मोकळें
रंग दाटले निळे नि पिवळे
सौंदर्यहि उसळलें आगळें
जा त्यांतुन स्वर्गाच्या दारीं !
अिंद्राचा दरबार थाटला
बसले सिंहासनीं देव-गण
तेजोवस्त्रें अंगीं लेवुन
आणि चाललें नर्तन-गायन
ध्वनी तयांचा तिथें दाटला !
कुणी अप्सरा पेला भरुनी
दे वारुणिचा मग इंद्राला
थेंब एक त्यांतील सांडला
तोंच तिजवर इंद्र कोपला
पृथ्वीवर लोटिलें शापुनी !
अधःपात हा हाय ! केवढा
आणिक ती तर कोमलांगना !
आली तिजला क्षणां मूर्छना

ह्याच पराक्रम देवांचा ना ?
    —अबलांना जो छळी तेवढा !
    नकोत असले देव आम्हांला
सोन्याच्या जे बसति पलंगीं
घडवुनी घेती सेवा अंगीं
आणिक जे निस्संगहि संगीं !
    म्हणा मुलिच्या पाठिं लागला ! !

२

    चल तर प्रतिभे ! नीघ तेथुनी
अंतराळ हें विशाल पसरे
चंद्र-सूर्य देतातच मुजरे
प्रचंड पर्वत होती हुजरे !
    असलें वैभव लेऊी अवनी !
    गगनश्रीचा शालू सुंदर
तारका-खडी वरी काढिली
चंद्-कोर ती भालिं रेखिली
हंसतांना तिजलाच देखिली
    तों तेजें त्या उजळे अंबर !
    हाय ! परंतु गगन झांकळे
पडती ह्या तारका निखळुनी

जातें सारें तेज लोपुनी
पसरतसे अवकळाच गगनीं
क्षणांत बघ सौंदर्य विरघळे !
कशास चंद्राकडे पाहसी ?
आतां तो तर क्षीण जाहला
[तारेशीं संभोग घेतला !
म्हणून हा वैभवास मुकला ?]
कलंक लेअी कला-विलासी !
कला तीच जी खुलवी जीवन
गाणीं गाअू त्याच कलेवर
तिजवांचुनी अन्य तें कलेवर
जीवन नभ हें—चंद्र, कला वर
कलेहुनी तर श्रेष्ठच जीवन !

३

जीवन तुजला साद घालितें
तरी निसर्गाकडेच जाशी
'कुहूकुहू' संगीत अैकशी
चांफ्याशीं गुजगोष्टी करिशी
सौगंधें मन तुझें झिंगतें !
बघुनी फुलता बागबगीचा

हरिणीपरि बागडशी तीव्र
झेंप झालिशी फुलाफुलावर
झोंके घेशी लतातरुंवर
    बहर आवडे तुला सुगीचा !
    त्यांतुन तुजला वसंत प्यारा
आगळेच कीं त्याचें वैभव
सहकारांचे फुलती पल्लव
आणि मंजऱ्या तरारती नव
    तो मदनाचा सक्त पहारा !
    मदन-मदन तर सखाच तुजला !
सदैव त्याच्यासंगें रमणें
गुल्लुगुल्लु गालांमधें हांसणें
कटाक्षशर त्यावरी फेंकणें !
    आणि पिणें मद्याचा प्याला !

४

    पुरे पञ्चबाणांसह रमणें
अुतरू चल जड जगतावरती
किंकाळ्या कानांवर येती
कितीक हृदयें रडती, कढती
    शान्तविणें तीं सहकंपानें !

ठाणें ... संग्रहालय
का/०२नं. ११८८
१०/८/१९
ठाणें.

    कोठें बंदी पहा ! तगमगे
'करकरते बेडी विक्राळ'
विकट हास्य जणुं करितो काळ !
ह्रदयें होती तों घायाळ
    परवशता ही अुरीं धगधगे !
    पोटामध्यें आग पेटली
नाहीं अश्रू विझवायाला
मिळे न पुरतें कीं खायाला
वस्त्रें पुरतीं नच ल्यायाला
    भयाण शान्ती इथें दाटली !
    ही शान्ती वादळापूर्विंची
अुठतिल मग त्या प्रचंड लाटा
फुटेल पाणी सहस्र वाटा
कुणीही न लागणार कांठा
    शान्ती ही दूतिका क्रांतिची
    बघ संचरती नभीं विमानें
युद्ध देवता करी गर्जना
अग्न्यस्त्रांच्या करी वर्षणा
चिरडी मानव जैं मुंग्यांना
    तशीच मानव ही लीलेनें !

क्रिस्त, बुद्ध कीं व्याकुळतील
हळहळेल तो थोर महात्मा
कळवळेल कितिकांचा आत्मा
देअिल कुणि आहुती हुतात्मा
अश्रू कितिकांचे गळतील !

५

पोट अुपाशी हें गुरगुरतें !
अुपासही देतसे चेतना !
आग लावितो प्रासादांना
साद अुठवितो पडसादांना
मूक मानवालाही गिळिते !
किती भुकेनें तडफडताती
हृदय होतसे तों व्याकूळ
घेच तयाची तूं चाहूल !
सह-कंपाची त्यावर झूल
सहज घालणें तुझिया हातीं !!
सारंगी दे दूर फेंकुनी
टाक मोडुनी मंजुळ पांवा
'तुतारि'चाच स्वर अैकावा
'रण-शिंगा'चा साद अुठावा

'झेंडा बंडाचाच' धरोनी !
येअू दे लढण्यास हुशारी !
तुटल्यावर ह्या क्रूर शृंखला
जिंकल्यावरी प्रबल ह्या खला
कलेस गा मग, मग प्रीतीला
अन् मग घे बेफाम भरारी !!

पुणें, ५–९–३८.

REFBK-0005909
REFBK-0005909

## शान्तिदूत— !

[ छन्द : पेरीना किंवा मुक्त

[ 'शांतिदूत' ह्या प्रदीर्घ मुक्तछंदीय काव्यांतील अेक अुतारा ]

कोठें शान्तिदूता, तुझा निवास ?
धुंडून धुंडून तुजला झाली अशान्त काया
आणिक जडला तुझाच ध्यास !
ख्रिस्त, बुद्ध, शुक्र आणि मुकुंद
गान्धी महात्मा हीं तुझींच रूपें
युगायुगांतून अवतरलीं कीं विश्वावर ह्या ?
मुनी-जनांच्या आश्रमांतून केलास दूता, तूं स्वैर विहार

पवित्र, अुदात्त, सुंदर अन् सत्य यांचेच ठायीं कीं तुझें माहेर ?
दाखव अेकदां साकार रूप !
पाहून तुजला अशान्त जीवित जाअील क्षणांत हें अुजळून !
थोरींची तुझिया मनोमन मज रे शान्तिदूता, पटेल खूण !
कोठें आणि तूज कितीक धुण्डूं ?
सांग, सांग दूता, कोठें निवास ?
बसलास कीं तूं संध्या-रंगांत ?
शान्त सागराच्या कीं तरंगांत ?
सांडसी किंवा तूं चंद्र-करांतून ?
कीं बालकांच्या नयनांमधून ?
किंवा आअीच्या तूं बसशी कोमल अंगाअी-गीतांत अन् वात्सल्यांत ?
विहार तुजला रुचतो कोठें ?
जेथें भेटतात अुत्तुंग पर्वत-शिखरें अथाङ्ग नील आकाशास
कीं संध्यासमयीं गुरा-पोरासवें हांसत नाचत येतोस घरास ?
याहून अेखादें भीषण ठिकाण ?
कां रे तें स्मशान तूझें वास-स्थान ?
तेथें बसशीं तूं विषण्णतेंत
दाव तुझें मज आनंदित स्थान !
अथाङ्ग तुडुंब सरोवर-कांठीं बसशीं दूता, हांसत काय ?
काळोखाच्या संगें विश्वावर किंवा चाहुलीवांचून टाकिशी पाय

समाधाना-पोटीं रे तुझा जन्म
अभ्युदय, सुख हीं तुझीं बाळें
शान्ति-दूता, चल दाखव अेकदां साकार रूप !

सुधाकर तूझ्या बसे नयनीं
निसर्गश्री आणि हांसे वदनीं
कोमल दडलीं गीतें पंखांत
अुडतां अुडतां खालीं सांडतात !
वसे हृदयांत तरल कौतुक
आणि वाणीमधीं माधुर्य अमूप
भुरभुरतात केस सोनेरी
दंत-पंक्ती ताऱ्यांपरी रुपेरी
पाय-तळीं कीं गुलाबफुलें
कपाळावरी भव्यता खुले
रमणीपरी केव्हां सुंदर
सागरापरी केव्हां गंभीर
मंदिरापरी केव्हां प्रसन्न
स्मशानापरी केव्हां विषण्ण
सर्वांगांत भरे आनंदीआनंद
विचारीपणाचा तूजला छंद

जनांहून प्यार विजनवास
कां रे सोडियलें तूंच मानवास ?
अेखाद्यावरीच परंतु प्रसन्न
वसून विश्वांत विश्वाहून भिन्न !
युगायुगांतून क्वचितच घेशी विश्वाकृती ह्या दूता, अवतार
तुजवांचून ह्या अशांत पेटल्या जगताला रे कवण आधार ?
ये शान्ति-दूता, हलवित ते अिवलेसे पंख
ना तर आतां विश्व पेटणार ! ४३०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.